cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –४ | अंक–३५३ | शुक्रवार, दि.१८ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## आनंददायी वार्ता प्रोत्साहन देणारी

निसर्गात जी शक्ती आणि ताकद आहे ती कशातच नाही. नुकतीच एक आनंदवार्ता आली आहे आणि अवघी धरती आनंदली आहे. यंदा मान्सून सरासरी एवढा व चांगला बरसणार. बस या एका वार्तेने बळीराजाच नव्हे तर बाजारही आनंदला आहे. नोटा कितीही छापता येतात पण ज्वारी, गहू, तांदूळ पिकावा लागतो, पिकवावा लागतो. माणूस पैसा खातो पण त्याला नोटा खाऊन जगता येत नाही. त्याला जगण्यासाठी भाजी भाकरी आणि पाणी लागते आणि हे सारे मिळावे यासाठी पर्जन्य कृपा महत्त्वाची असते.

## मुख्यमंत्री फडणवीसांना नागपूर खंडपीठाचे समन्स

नागपूरः राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने समन्स बजावले आहे. काँग्रेस नेते प्रफुल्ल गुडधे यांनी नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील निकालाबाबत खंडपीठामध्ये याचिका दाखल केली होती. फडणवीसांसह मते, भांगडिया यांनाही कोर्टाने समन्स बजावले आहेत. काँग्रेस नेते प्रफुल्ल गुडधे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभा निवडणुकीतील विजयाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. निवडणुकीत प्रक्रियात्मक त्रुटी आणि भ्रष्ट पद्धतींचा वापर केल्याचा निवडणूक याचिकेत दावा करण्यात आलेला आहे.

# एकच जिद्द शक्तिपीठ रद्द !

## लातूर आणि बीडच्या शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गाचं सर्वेक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांना हाकलले

**बीड । प्रतिनिधी**

**पश्चिम महाराष्ट्रात शक्तिपीठ महामार्गावरुन राजकारण चांगलेच तापले आहे. त्यातच आता मराठवाड्यातील बीड आणि लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या महामार्गाला विरोध कायम ठेवला आहे. महामार्गाची मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना मोजणी न करताच परत जावे लागले आहे. एकच जिद्द शक्तिपीठ रद्द अशी जोरदार घोषणाबाजी शेतकऱ्यांनी आलेल्या अधिकाऱ्यांसमोर केली.**




राज्यातील १२ जिल्ह्यातील धार्मिक स्थळांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग निर्माण करण्यात येणार आहे. परंतु या महामार्गाला लातूर आणि बीड जिल्ह्यातील अनेक गावांचा विरोध आहे. राज्य सरकार मात्र महामार्ग पूर्ण करण्यासाठी आग्रही असल्याचे दिसत आहे. मागच्या वेळी सुद्धा बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांना मोजणी करू दिली नव्हती. बीड जिल्ह्यातील परळी आणि अंबाजोगाई तर लातूर जिल्ह्यातील रेणापूर, लातूर आणि औसा या पाच तालुक्यातून शक्तिपीठ महामार्ग जाणार आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील ४६ किलोमीटर, तर लातूर जिल्ह्यातील ४१ किलोमीटर हा महामार्ग जाणार आहे. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यातील ३५ गावांमध्ये ८७ किलोमीटरसाठी ८५० हेक्टरपेक्षा अधिक जमीन संपादित करावी लागणार आहे. परंतु शेतकऱ्यांचा मात्र या महामार्गाला तिव्र विरोध होत आहे. दरम्यान, शक्तिपीठ महामार्गाच्या भुसंपादनाचे काम सुरू करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यातील चाडगाव येथे महसूल विभागातील अधिकारी आणि काही कर्मचारी आले होते. या अधिकाऱ्यांना जमिनीची मोजणी करायची होती. परंतु शेजारील आठ पान २ वर

### या गावातील शेतकऱ्यांनी केला विरोध

अधिकाऱ्यांच्या मोजणीला विरोध करण्यासाठी लातूर आणि बीड जिल्ह्यातील शेतकरी जमा झाले होते. यामध्ये चडगाव, मोरवड, नांदगाव, सायगाव, भारज, भोकरंबा, दिघोळ देशमुख आणि रामेश्वर या गावातील शेतकरी एकवटले आहेत. तसेच महामार्ग होऊ नये, यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करणार असल्याची भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. तर गावात कोणतीही यंत्रणा येऊ देणार नाही, असाही निर्धार या गावकऱ्यांनी घेतला आहे.

### ३५ गावांतून जाणार ८७ किलोमीटरचा मार्ग

शक्तिपीठ महामार्ग बीड जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई तसेच लातूर जिल्ह्यातील रेणापूर, लातूर आणि औसा या एकूण पाच तालुक्यातून जाणार आहे. बीड जिल्ह्यातून ४६ किलोमीटर, तर लातूर जिल्ह्यातून ४१ किलोमीटर हा मार्ग असेल. दोन्ही जिल्ह्यातील पाचही तालुक्यातील जवळपास ३५ गाव शिवारातून हा मार्ग जाणार आहे. बीड आणि लातूर जिल्ह्यातून जाणाऱ्या सुमारे ८७ किलोमीटरच्या शक्तिपीठ मार्गासाठी सुमारे ८५० हेक्टर पेक्षा जास्त जमीन अधिग्रहीत करावी लागणार आहे. याच कारणामुळे मोठ्या संख्येने बाधित लोक एकत्रित येऊन विरोध करीत आहेत.

## राज्यातील कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार आता आयुक्तांकडे

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील कृषी विभागातील सर्वच बदल्या मंत्र्यांकडून नव्हे तर आयुक्तांकडून होणार आहे. महाराष्ट्राच्या कृषी विभागातील गट अ, ब, क व ड या चारही विभागातील कृषी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार आता कृषी आयुक्तांकडे देण्यात आले आहेत. क्लास १ व क्लास २ च्या कृषी अधिकाऱ्यांचाही यात समावेश आहे.**

कृषी विभागात अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी होणाऱ्या आर्थिक गैरव्यवहार थांबवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाने बदल्यांसाठी होणारे सत्तेचे विकेंद्रीकरण होत असल्याने या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. कृषी विभागातील बदल्यांसंदर्भात होणारा राजकीय हस्तक्षेपाला नियंत्रण बसणार आहे. कृषी विभागात मागेल तिथे बदलीचे धोरण मंत्रालयातून चालत असल्याचा आरोप गेल्या अनेक दिवसांपासून होतो. मर्जीतील अधिकाऱ्यांच्या हव्या असलेल्या ठिकाणी बदल्यांच्या बदल्यात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोपही झाला. दरम्यान, आता बदल्यांसदर्भात पान २ वर

# वक्फ कायद्यातील दोन तरतुदींना सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

## सरकारला धक्का, पुढील सुनावणी ५ मे रोजी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**वक्फ सुधारणा कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान गुरूवारी कोर्टाने केंद्र सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारने पारित केलेल्या वक्फ सुधारणा या संपूर्ण कायद्याला न्यायालयाने स्थगिती दिली नसली तरी या कायद्यातील नव्या दोन तरतुदींना अंतरिम स्थगिती दिली आहे. याबाबत सरकारचे म्हणणे मांडण्यासाठी सात दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे. तसेच याप्रकरणी पुढील सुनावणी ५ मे रोजी होणार आहे.**

वक्फ याचिकांवर सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. नव्या वक्फ कायद्यातील दोन महत्त्वपूर्ण तरतुदींना सर्वोच्च न्यायालयाकडून अंतरिम स्थगिती देण्यात आल्याने सरकारला हा धक्का मानला जात आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकारच्या वतीने आश्वासन दिले की, पुढील सुनावणीच्या तारखेपर्यंत, २०२५ च्या कायद्याअंतर्गत बोर्ड आणि कौन्सिलमध्ये कोणतीही नियुक्ती होणार नाही. तसेच केंद्राने याबाबत उत्तर दाखल करण्यासाठी ७ दिवसांचा वेळ मागितला. पान २ वर




### वक्फ दुरूस्ती कायद्याविरुद्ध १२ याचिका दाखल

वक्फ कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या एकूण १२ याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिका एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी, आप नेते अमानतुल्ला खान, असोसिएशन फॉर द प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राइट्स, अर्शद मदनी, समस्थ केरळ जमियातुल उलेमा, अंजुम कादारी, तैय्यब खान सलमानी, मोहम्मद शफी, मोहम्मद फजलुररहीम आणि आरजेडी नेते मनोज कुमार झा यांनी दाखल केल्या होत्या. तसेच तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा आणि समाजवादी पक्षाचे नेते झिया-उर-रहमान बर्क यांनी दाखल केलेल्या नवीन याचिका दाखल केल्या आहेत.

### कायद्यावर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही – सर्वोच्च न्यायालय

खंडपीठ म्हणाले, या कायद्यामध्ये काही सकारात्मक बाबी आहेत. त्यामुळे यावर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना कोणताही बदल होणार नाही याची खात्री न्यायालयाला करावी लागेल.

### सद्यातरी वक्फ मंडळांवर बिगरमुस्लीम सदस्य घेता येणार नाही

कोर्टाने वक्फ म्हणून घोषित केलेल्या मालमत्तांचा तो दर्जा काढून घेण्याचा अधिकार आणि केंद्रीय वक्फ परिषद व राज्य वक्फ मंडळांमध्ये बिगरमुस्लीम सदस्यांचा समावेश. अशा वादग्रस्त तरतुदींबद्दल कोर्टाने यापूर्वीच तीव्र नाराजी व्यक्त केली होती. गुरूवार दि.१७ रोजी सर्वोच्च न्यायालयाने याबाबतच्या दोन्ही तरतुदींना अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे तूर्तास तरी सरकार केंद्रीय वक्फ परिषद किंवा राज्य वक्फ मंडळांमध्ये बिगरमुस्लीम सदस्यांचा समावेश करू शकणार नाही.

## संतोष देशमुख प्रकरण : एसआयटीमध्ये आणखी दोन पोलिसांची नेमणूक

**बीड । प्रतिनिधीर**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन हत्या, खंडणी प्रकरणाचा विशेष तपास पथकाने तपास करुन विशेष मकोका न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. या विशेष तपास पथकात शासनाच्या गृह विभागाने या पथकात केज येथील दोन पोलिसांची नेमणूक केली आहे. सध्या व भविष्यातील तपासासाठी गृह विभागाने विशेष पथकात या दोघांची नेमणूक केली आहे.



९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण करुन हत्या करण्यात आली. वाल्मीक कराडने अवादा कंपनीला मागीतलेल्या दोन कोटी रुपयांच्या खंडणीला अडसर ठरल्याने संतोष देशमुख यांची हत्या झाल्याचे तपासात उघड झाले. गुन्हे अन्वेषण विभागाच्या आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. बसवराज तेली यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथकाने फेब्रुवारी महिन्यात या घटनेचा तपास करुन दीड हजार पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. आता या विशेष तपास पथकात शासनाच्या गृह विभागाने या पथकात केज पोलिस ठाण्यातील हवालदार राजू वंजारे व केजच्याच उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयातील पान २ वर

## आरोपी दत्ता गाडेविरोधात ८९३ पानी दोषारोपपत्र दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यभरात खळबळ माजवणाऱ्या स्वारगेट एस.टी. स्थानक बलात्कार प्रकरणात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत आरोपी दत्तात्रय गाडे याच्याविरोधात ८९३ पानांचे दोषारोपपत्र शिवाजीनगर येथील सत्र न्यायालयात दाखल केले आहे. ५२ दिवसांत खंडणीविरोधी पथकाने हा तपास पूर्ण करत दोषारोपपत्र दाखल केले आहे.

हा धक्कादायक प्रकार २५ फेब्रुवारी रोजी सकाळी सहाच्या सुमारास घडला होता. परगावी जाण्यासाठी स्वारगेट एस.टी. स्थानकात आलेल्या एका तरुणीकडे आरोपी दत्ता गाडे याने स्वत:ला वाहक असल्याची बतावणी केली. त्यानंतर तरुणीला एका शिवशाही बसमध्ये नेऊन, दरवाजा बंद करून तिला जीवे मारण्याची धमकी देत दोनदा बलात्काकेला. या घटनेनंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली पान २ वर

## राष्ट्रपतींना आदेश, ही कसली लोकशाही ?

### उपराष्ट्रपती धनखड सुप्रीम कोर्टावर भडकले

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा ठरवणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयावरून राष्ट्रपतींना आदेश देता ही कसली लोकशाही? असा सवाल उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सुप्रीम कोर्टाला केला आहे.

न्यायपालिका आणि न्यायालयाच्या अधिकारांवरून जोरदार टीका करताना धनखड म्हणाले की, आपल्याकडे अशी परिस्थिती असू शकत नाही की न्यायालय राष्ट्रपतींना निर्देश देईल. घटनेच्या दृष्टीकोनातून विचार केला, तर अनुच्छेद १४२ न्यायालयाला विशेष अधिकार देतो, पण हे कलम आता जणू अण्वस्त्रशक्ती झाली आहे. न्यायपालिका ती २४७ वापरते,'' असा घणाघात धनखड यांनी केला. राज्यसभेच्या सहाव्या बॅचच्या इंटर्नसना संबोधित करताना त्यांनी दिल्लीत उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरी झालेल्या मोठ्या रोकड जप्तीचाही उल्लेख केला. १४ आणि १५ मार्चच्या रात्री, एका न्यायाधीशाच्या घरी घडलेली घटना सात दिवसांपर्यंत कोणालाच माहिती नव्हती. हा विलंब समजण्यासारखे आहे का? क्षम्य आहे का? यामुळे काही मूलभूत प्रश्न निर्माण होत नाहीत का?'' असे प्रश्न उपस्थित पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८२.५० क्विंटल | २,२२० | ३,०२१ | २,६२९ |
| ज्वारी/हायब्रिड: २६१.०० क्विंटल | १,९०० | ३,९६० | २,५४१ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५२.०० क्विंटल | २,५०० | २,७३० | २,५५९ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,४०० | ४,४५० | ४,४३३ |
| हरभरा: २२.५० क्विंटल | ५,४५० | ६,७०० | ५,७०१ |

## पीओके रिकामा करावाच लागेल : भारताचे पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखांना सडेतोड प्रत्यूत्तर

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

काश्मीर आमची मुख्य धमनी होती आहे आणि राहील. आम्ही ती विसरणार नाही. जगातील कोणतीही ताकद काश्मीरला पाकिस्तानपासून वेगळे करू शकत नाही, अशी वल्गना करणाऱ्या पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखांना भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. पाकिस्तान लष्कर प्रमुखांच्या काश्मीर आणि द्विराष्ट्र सिद्धांतावरील विधानावर प्रतिक्रिया देताना भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, ''पाकिस्तानची निर्मिती धर्माच्या आधारावर झाली होती. मात्र बांगलादेशची स्थापना होताच हा सिद्धांत अयशस्वी झाला. जम्मू-काश्मीर हे भारताचे अभिन्न अंग आहे. पाकिस्तानने बेकायदेशीररित्या पान २ वर

## बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी पंकजा मुंडेंनी स्विकारली

### निर्घृण हत्येने मन सुन्न झाले ; धडाडीचा कार्यकर्ता गमावल्याचे दुःख

**बीड । प्रतिनिधी**

भाजपचे लोकसभा विस्तारक बाबासाहेब आगे यांच्या निर्घृण हत्येनंतर त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी स्विकारली आहे. आगे यांच्या हत्येने मन सुन्न झाले, एक धडाडीचा कार्यकर्ता मी गमावला आहे अशा शब्दांत त्यांनी आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत.

बाबासाहेब आगे यांची निर्घृण हत्या झाल्याची बातमी जेव्हा कानावर आली, ते ऐकून मन सुन्न झाले. काहीच सुचत नव्हते, त्यामुळे एका दिवसानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी या घटनेवर आपल्या शोक भावना व्यक्त केल्या आहेत. आगे हे भाजपचे धडाडीचे कार्यकर्ते पान २ वर



# कामगारांचे वेतन न वाढवणे हा कामगारांवर अन्याय

## मनरेगावरुन काँग्रेसचा केंद्र सरकारवर निशाणा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान, काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांनी राज्यसभेत शून्य प्रहरात मनरेगा वेतनाबाबत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नांनंतर, मनरेगा कामगारांच्या वेतनवाढीबाबत काँग्रेस सतत केंद्र सरकारवर हल्ला करत आहे. या संदर्भात, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन यांनी गुरुवारी पुन्हा एकदा निशाणा साधला आहे.**

काँग्रेस अध्यक्षांनी सोशल मीडिया साइटवर म्हटले आहे की, मनरेगा कामगारांचे वेतन न वाढवणे हा कामगारांवर अन्याय आहे. हे मनरेगा कामगारांच्या हक्कांवर हल्ला करण्यासारखे आहे. मनरेगा कामगारांसाठी किमान ४०० रुपये प्रतिदिन वेतन निश्चित करण्याच्या आणि वर्षातून किमान १५० दिवस काम देण्याच्या मागणीवर काँग्रेस ठाम असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी त्यांनी संयुक्त संसदीय समितीच्या शिफारशीचा हवाला दिला. संसदीय समितीने मनरेगा कामगारांचे वेतन ४०० रुपये करण्याची शिफारस केली होती. २०२३ मध्ये स्थापन झालेल्या अमरजीत सिन्हा यांच्या उच्चस्तरीय समितीनेही वेतन आणि मनरेगा बजेट वाढवण्याची सूचना केली होती हे उल्लेखनीय आहे. याला आधार पान २ वर



cmyk

अग्रलेख

# आनंददायी वार्ता प्रोत्साहन देणारी

निसर्गात जी शक्ती आणि ताकद आहे ती कशातच नाही. नुकतीच एक आनंदवार्ता आली आहे आणि अवघी धरती आनंदली आहे. यंदा मान्सून सरासरी एवढा व चांगला बरसणार. बस या एका वार्तेने बळीराजाच नव्हे तर बाजारही आनंदला आहे. नोटा कितीही छापता येतात पण ज्वारी, गहू, तांदूळ पिकावा लागतो, पिकवावा लागतो. माणूस पैसा खातो पण त्याला नोटा खाऊन जगता येत नाही. त्याला जगण्यासाठी भाजी भाकरी आणि पाणी लागते आणि हे सारे मिळावे यासाठी पर्जन्य कृपा महत्त्वाची असते.

भारतासारख्या काही देशांवर जूनमध्ये मोसमी पाऊस बरसतो. त्यामुळे भारतात पावसाळा, हिवाळा, उन्हाळा असे ऋतुचक्र सुरु राहते आणि शेतीचे खरीप आणि रब्बी असे दोन भाग पडतात. ओघानेच सर्वांच्या नजरा पावसाकडे, पावसाच्या अंदाजाकडे आणि खरीप हंगामाकडे लागलेल्या असतात. अलीकडे धरणे, तलाव, शेततळी बोअरवेल अशा सुधारणा झाल्या आहेत. त्यामुळे शेतीला बारमाही पाणी उपलब्ध होते पण या सुधारणांचा स्त्रात पाऊसच असल्याने सर्व जीवन पावसावर अवलंबून असते. अजूनही कितीतरी जमीन कोरडवाहू आणि नापेर आहे. पावसाचा अंदाज व्यक्त करणारे विविध गोष्टींचा अभ्यास करतात, पक्षांनी घरटी किती उंचीवर बांधली इथपासून समुद्रातील तापमान, काही झाडांना आलेला मोहोर, अल निनो वगैरे स्थिती, मुंग्या, पक्षी, प्राणी यांच्या हालचाली या सर्वांचा अंदाज घेत पर्जन्य अंदाज व्यक्त करणारी मॉडेल तयार झाली आहेत. मानवाने जे उपग्रह अवकाशात पाठवलेत त्यांचाही याकामी उपयोग होत असतो. ओघानेच हे एक शास्त्र म्हणून विकसित झाले आहे व त्यावर विश्वास ठेवून नियोजन केले जाते. इंडियन ओशन डायपोल म्हणजेच हिंदी महासागरातील द्विध्रुव. अर्थात या महासागराच्या पूर्व आणि पश्चिम भागांतील पाण्याचे असमान तापमान. सकारात्मक असते म्हणजे पश्चिम हिंदी महासागराचे तापमान पूर्वेपेक्षा जास्त असते, तेव्हा ती स्थिती भारतात मान्सूनला पोषक ठरताना दिसते. पॅसिफिक महासागरात दक्षिण अमेरिकेच्या आसपास पाण्याचे तापमान जेव्हा नेहमीपेक्षा वाढते आणि ते गरम पाणी पश्चिमेला आशियाकडे सरकते, तेव्हा त्या स्थितीला 'एल-निनो' असे संबोधले जाते. ला निना ही त्याउलट स्थिती आहे. या एल निनो आणि ला निना प्रवाहांचा जगभरातल्या हवामानावर आणि भारतातल्या मान्सूनवरही परिणाम होताना दिसतो. साधारणपणे भारतात एल निनोच्या काळात कमी तर ला निनाच्या काळात जास्त पाऊस पडताना दिसतो. सर्व गोष्टी पाहता भारतीय हवामान विभागाने यंदा मान्सूनच्या काळात भारतात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल, असा अंदाज वर्तवला आहे.

हवामानाचा हा अंदाज संपूर्ण मोसमासाठीचा आणि संपूर्ण देशासाठीचा असून पुढच्या काही आठवड्यांतील निरीक्षणांनी त्यात आणखी अचूकता येईल. याचा अर्थ असा, की हा दीर्घकालीन अंदाज केवळ एकूण किती पाऊस पडेल आणि कुठे जास्त पावसाची शक्यता आहे, याचे चित्र दर्शवतो. पण त्या पावसाचे वितरण कसे असेल, पावसाळी दिवसांची संख्या काय असेल, हे स्पष्ट होण्यासाठी काही काळ वाट पाहावी लागेल. तसेच यंदा मान्सूनचे आगमन कधी अपेक्षित आहे, याविषयीचा अंदाज हवामान विभाग मे महिन्याच्या सुरुवातीला वर्तवण्याची शक्यता आहे. तर मे महिन्याच्या अखेरीस मोसमासाठीचं भाकित जाहीर केले जाईल. ओघानेच सुरवात चांगली झाली आहे. आपल्याकडे कडक उन्हाळा, आंबा पिक आणि बहावा वगैरे झाडांचे फुलणे यावरुन शेतकरी अंदाज बांधतात आणि खरीप हंगामाची तयारी करतात. कधी काळी आपण अन्नधान्य आयात करत होतो पण आता आपल्याकडे बफर स्टॉक असतो. करोना काळात ८० कोटी लोकसंख्येला भारताने मोफत धान्य पुरवले होते ही बळीराजाची शक्ती आहे. हरितक्रांती नंतर भारताने शेतीत जी प्रगती केली ती वाखाणण्याजोगी आहे. नवे संकरीत वाण, पिक पद्धती आणि पाण्याचा परिणामकारक वापर यामुळे शेतीत सुधारणा होते आहे. नवनवीन औजारे आणि मिश्र पिके, सेंद्रिय शेती या सर्वाचा फायदा वाढीव लोकसंख्येला होतो आहे. शेतात जोंधळ्याचा एक दाणा पेरला तर चार महिन्यांत त्याचे मापटेभर दाणे होतात ही किमया इतरत्र नाही. तथापि शेतकऱ्यांना आपल्या शेतीमालाचा दर ठरवण्याचा हक्क नाही. ओघानेच बळीराजा कायम कर्जात राहतो. जय किसान आणि बळीराजाचे उत्पन्न तिप्पट करणार या केवळ घोषणा राहतात आणि शेतकरी आत्महत्या हा विषय गंभीर बनतो. मान्सूनचा अंदाज आला आणि चांगला पाऊस अशी शक्यता दिसली तरी सर्वत्र आनंदी आनंद दिसतो. बाजारात अन्नधान्य स्वस्ताई होते. शेअरबाजार उंचावतो आणि ट्रंप वगैरे कुणी काहीही कारवाया करो, भारतीय शेतकरी डगमगत नाही. शेतीला चांगल्या पावसा इतकीच चांगले बियाणे, आवश्यक खत आणि किटकनाशके यांची गरज असते. महाराष्ट्रात शेतकरी कर्जमाफी हा विषय प्रलंबित आहे. हंगामापूर्वी त्याला सावकाराच्या दारात जावे लागणार नाही आणि बि-बियाणे उच्च प्रतिचे मिळेल अशी सरकारने काळजी घेतली पाहिजे. शेतीसाठी एआय तंत्रज्ञान निर्माण झाले आहे. ते शेतकऱ्यांना बांधावर उपलब्ध होणेसाठी काही काळ जावा लागेल. दरम्यान सरकारने हे तंत्रज्ञान आत्मसात करुन शेतकऱ्यांना प्रशिक्षित केले पाहिजे. शेतीत एकरी उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. एका एकरात १२० टन ऊस पिकतो व शेजारी एकरी २० टनही पिकत नाही, हा विरोधाभास संपला पाहिजे. चांगला पाऊस बरसणार ही वार्ताच आनंददायी आहे. या वार्तेने अवघे शिवार आनंदले आहे. बळीराजा सुखावला आहे. आता मेघराज कधी शिवारात सांडतो आणि मातीचा कण कण फुलून खरीप हंगाम यशस्वी करतो हे बघायचे.

# जालन्यात गुटखा घेवून जाणारा ट्रक पकडला

## ट्रक सह ६४ लाखाचा मुद्देमाल जप्त

अंबड । प्रतिनिधी

**अहमदनगर मार्गावरून अंबड मार्गे जालना येथे गुटखा घेऊन जाणारी ट्रक पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या सूचनावरून अंबड पोलीस स्टेशनचे प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक श्री सिद्धार्थ बारवाल यांनी गोपनीय कारवाई करून जालना कडे गुटखा घेऊन जाणारा ट्रक पकडून चौकशीसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. ट्रकच्या गुटखा संदर्भात ट्रक चालक ला विचारले असता बाहेरच्या राज्यातून हा ट्रक अहमदनगरकडून अंबड मार्गे जालन्यात पोहोच करण्यात येणार होता इथपर्यंत माहिती ट्रक चालक कडून सांगण्यात आलं तसेच सदरील ट्रक नंबर प्लेटवर स्टिकर ने नंबर चिटकण्यात आले होते. सदरील याप्रकरणी आरटीओ विभागामार्फत ट्रकची चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच येवले या मालकाची ट्रक असल्याचे सांगण्यात येते.**

१६ एप्रिल रोजीच्या रात्री २३.०० वा सुमारास पोलीस ठाणे अंबड चे प्रभारी अधिकारी परिविक्षाधिन पोलीस अधिक्षक श्री सिध्दार्थ बारवाल यांना गुप्त बातमीदारा कडून गुप्त बातमी मिळाली की अंबड ते जालना जाणारे रोडने एक ट्रक क्र. एम.एच.०४. डी. के. ७१०७ यामध्ये मानवी आरोग्यास घातक प्रतिबंधित केलेला गुटखा घेवुन जात आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने त्यांनी रात्रगस्त करणारे पोलिसांना बोलावुन घेवुन त्यांना सदरची माहीती दिली त्या नंतर परि. पोलीस अधिक्षक सिध्दार्थ बारवाल यांच्या सोबत पोहेकों/१११८ चव्हाण, पोहेकाँ/१२७२ चव्हाण, पोअं/१६११ साठेवाड, पोअं/१६०६ गावडे पो. स्टे अंबड व पोना/१४५९ गायकवाड, पोअं/५६० शिंदे, पो.स्टे तालुका जालना असे खाजगी वाहनाने अंबड ते जालना रोडवर मठपिंपळगाव शिवारातील भारत पेट्रोल पंपाजवळ सापळा लावून सदरचा ट्रक क्र. एम.एच.०४. डी. के. ७१०७ पकडला व ट्रक चालक यशवंत गुणाजी जरे वय २५ वर्षे व्यवसाय ट्रक चालक रा. अंमळनेर ता. पाटोदा जि. बीड असे सांगितले सदर ट्रक मध्ये प्रतिबंधित अन्न पदार्थ गोवा गुटखा असल्याची खात्री झाल्याने सदर ट्रक हा ट्रक चालकासह पोलीस ठाणे अंबड येथे घेवून गेले त्या वेळी पोलिसांनी दोन पंचाना बोलावुन सदर ट्रकची झडती घेवून सदर ट्रक ची पहाणी केली असता सदर ट्रकमध्ये पांढरे रंगाचे ५५ मोठे भोद ज्यामध्ये प्रत्येक भोद मध्ये चार पांढरे रंगाच्या गोण्यात व प्रत्येक गोणीत केशरयुक्त गोवा १००० असे लेबल असलेले ७५ पाकीटे या प्रमाणे एकुण १६५०० पाकोटे प्रति पाकीट किंमत २५० रुपये एकूण किंमत ४१२५०००/- रुपये व १० पांढरे रंगाचे मोठे भोद, प्रत्येक मोद मध्ये ०६ पांढरे रंगाच्या गोण्यात प्रत्येक गोणीत केशरयुक्त वजीर असे लेबल असलेले ७५ पाकिटे याप्रमाणे एकूण ४५०० पाकीटे प्रति पाकीट किमत ३००/- रुपये एकूण किंमत १३५००००/- रुपये तसेच १००००००/- रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा एल.पी.टी. १६१३/४२ मॉडेलचा ट्रक जिचा पासिंग क्र. एम.एच.०४.डी.के.७१०७ असा असलेला जुना किंमती अंदाजे असा एकूण ६४७५०००/- रुपये चा गुटखा माल व ट्रक. मिळुन आल्याने त्यांनी दोन पंचासमक्ष जप्ती सदरचा मुद्देमाल ताब्यात घेतला. तसेच अन्न व औषध प्रशासन प्रशांत अजिंठेकर यांनी सदर मालाची पहाणी करुन संबंधीत इसमावर पोलीस ठाणे अंबड येथे गुरंन १९२/२०२५ कलम १२३,२२३,२७५,३(५) बी.एन.एस सह कलम ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हाचा तपास पोलीस करत आहे. सदरची



कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बंन्सल, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे अंबड चे परिविक्षाधिन पोलीस अधिक्षक श्री सिद्धार्थ बारवाल, पोहेकों विष्णु चव्हाण, पोहेकों फलटणकर, पोहेको १२७२ दिपक चव्हाण, पोलीस अंमलदार ३४४ , पोलीस अंमलदार ४७ स्वप्नील भिसे, पोकों १६११ साठेवाड, पोकों १६०६ गावडे पोस्टे अंबड तसेच पोलीस ठाणे तालुक जालना चे पोलीस नाईक १४४९ गायकवाड पो को ५६० शिंदे यांनी पार पाडली.

## राज्यात काही जिल्ह्यात उष्णतेत वाढ तर काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात उन्हाचा चटका चांगलाच वाढला आहे. तर काही भागात पावसाचाही अंदाज आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पुढील ५ दिवस काही ठिकाणी ढगाळ वातावरणासह पाऊस आणि बहुतांशी भागात उष्णता वाढण्याचा अंदाज आहे.**

हवामान विभागाने छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, लातूर, धाराशिव जिल्ह्यात उष्णता वाढण्याचा अंदाज दिला. काही भागात उष्ण आणि दमट हवामानाचा इशाराही देण्यात आला. नांदेड जिल्ह्यात हलक्या पावसाचीही शक्यता आहे. तर लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि ढगांच्या गडगडाटासह हलक्या आणि मध्य पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला. सोलापूर जिल्ह्यात पुढील ४ दिवस उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा असून काही ठिकाणी हलक्या सरी पडतील. सांगली जिल्ह्यात पावसाचा अंदाज आहे, तर दुसरीकडे उष्णताही वाढण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज आहे. कोल्हापूर जिल्ह्यात हलक्या सरी पडतील. तसेच पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात पुढील ५ दिवस उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा हवामान विभागाने दिला. धुळे, नंदूरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यात उष्ण तसेच दमट हवामनचा अंदाज हवामान विभागाने दिला. कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी जिल्ह्यात हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.

## सोने व पैसे बळजबरीने हिस्कावून घेणाऱ्या विरोधात स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना । प्रतिनिधी

**मातोश्री लॉन्स समोरील रोडवर संघर्ष ज्ञानेश म्हसलेकर, वय-१६ वर्ष, रा. चौधरीनगर, जालना यास तीन इसमांनी अडवुन त्याच्या कानातील सोन्याची बाळी व रु.५००/- हिस्कावुन घेतलेबाबत तालुका पोलीस ठाणे जालना येथे गुन्हा दाखल होता.**

सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी एक पथक तयार करुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या होत्या, त्यानुषंगाने गुन्ह्यातील गुन्हेगारांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरोपी आदित्य सुनिल उघडे, वय १९ वर्ष, रा. इंदेवाडी, जालना हा त्याच्या राहत्या घरी असलेबाबत माहिती मिळाल्याने त्यास त्याचे राहते घरातुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्यची कबुली देवुन गुन्हयात हिस्कावलेले रु.५००/- काढून दिले. व सदरचा गुन्हा हा त्याने त्याचे दोन साथीदारासह केला असल्याचे सांगितले. त्यानुषंगाने आरोपीच्या साथीदारांचा शोध घेतला असता त्यामध्ये दोन विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकांकडे गुन्हयातील मुददेमालाबाबत चौकशी करता त्याने सदरचा मुददेमाल नेहरु रोड, सराफा बाजार, जालना येथील विजय गोपीनाथ विसपुते या दुकानामध्ये दुकान मालक विजय गोपीनाथ विसपुते, रा.सराफा बाजार, जालना यास विक्री केल्याचे सांगितल्याने सराफा दुकानदार विजय गोपीनाथ विसपुते, याने गुन्हयातील मुददेमाल ०.९६० मिलीग्रॅम वजनाची कानातील सोन्याची बाळी रु.७५००/- किंमतीची सोन्याची कानातील बाळी घेतल्याचे कबुल करुन ती काढून दिल्याने ती तपासकामी जप्त करण्यात आली आहे.

## बापरे! पोलिस उपनिरीक्षकच चालवायचा चोरीचे रॅकेट?

जालना । प्रतिनिधी

**'पोलीसानेच चोरी केली', असं कुणी म्हटलं तर तुम्हाला विश्वास बसणार नाही. पण जळगाव जिल्हयात घडलेल्या घटनेमुळे तुम्हाला विश्वास बसेल हे नक्की. जालना येथे कार्यरत असलेला पोलीस उपनिरीक्षक चक्क जळगावच्या चोपड्यात चोरी करण्यासाठी आल्याचे समोर आले असून, पोलिसांनी चार चोरांना बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक याने चोरी केल्याची कबुली दिली असून, तो राज्यभरातील बसस्थानकावर चोरीचे रॅकेट चालवत असल्याचा पोलिसांना संशय आहे.**

पोलीस सूत्रानुसार, चोपडा तालुक्यातील वाळकी येथील शेतकरी वसंत उखा कोळी यांचे ३५ हजार रूपये चोरट्यांनी चोपडा बसस्थानकातून चोरून नेल्याची घटना बुधवारी तीन वाजेच्या सुमारास घडली. घटनेनंतर चोरट्यांनी वापरलेल्या इंडिगो कार (क्र एम एच-४३ एन-२९२८ व) चा पाठलाग करत, पोलिसांनी चोपडा-धरणगाव रस्त्यावर चोरट्यांना कारसह ताब्यात घेतले. धक्कादायक म्हणजे, या चार चोरांमध्ये जालना येथील पोलिस उपनिरीक्षक प्रल्हाद मान्टे याचा समावेश असल्याचे समोर आल्याने एकच खळबळ उडाली. दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक प्रल्हाद मान्टे याने चोरी केल्याची कबुली दिली असून, तो राज्यभरातील बसस्थानकावर चोरीचे रॅकेट चालवत असल्याचा पोलिसांना संशय आहे. चोरीचे रॅकेट चालवत असल्याचा संशय- दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक प्रल्हाद मान्टे हा राज्यभरातील बसस्थानकावर चोरीचे रॅकेट चालवत असल्याचा पोलिसांना संशय आहे. पकडले जावू नये म्हणून प्रल्हाद मान्टे हा कधीही हॉटेल किंवा लॉजवर थांबत नसल्याची माहिती समोर आली आहे. तसेच त्याच्या कारमधून स्वयंपाक बनवण्याचे साहित्य, अंथरूण-पांघरून ताब्यात घेण्यात आले आहे. चोपडा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मधुकर साळवे पीएसआय जितेंद्र वल्टे, एकनाथ भिसे व पोलिस कर्मचारी रितेश चौधरी, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, विलेश सोनवणे, दीपक माळी, रवींद्र पाटील, पोलिस नाईक हेमंत पाटील यांनी ही कारवाई केली आहे. पोलिस उपनिरीक्षक जितेंद्र वल्टे हे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# व्ही.शांताराम जीवन गौरव महेश मांजरेकर यांना

## राज कपूर जीवन गौरव पुरस्कार अनुपम खेर यांना, काजोल देवगण व मुक्ता बर्वे यांचाही पुरस्कारात समावेश

मुंबई । पतिनिधी

**महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या मानाच्या चित्रपट पुरस्कारांची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी गुरूवारी (दि.१७) मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेत केली. यामध्ये चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार, चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार, स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार, स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार तसेच गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार अशा पाच महत्त्वाच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.**

या वर्षीचा चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार नामवंत अभिनेता, दिग्दर्शक व निर्माते महेश मांजरेकर जाहीर झाला आहे. हा पुरस्कार १० लाख रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक यासह दिला जातो. चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार यंदा प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना प्रदान करण्यात येणार असून, या पुरस्काराचे स्वरूप ६ लाख, स्मृतीचिन्ह, मानपत्र व चांदीचे पदक असे आहे. हिंदी चित्रपट सृष्टीतील मानाच्या स्व.राज कपूर जीवन गौरव पुरस्कार प्रख्यात अभिनेते अनुपम



खेर यांना देण्यात येणार आहे. तर स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार यंदा अष्टपैलू अभिनेत्री काजोल देवगण यांना मिळणार आहे. या दोन्ही पुरस्कारांचे अनुक्रमे १० लाख व ६ लाखांचे स्वरूप आहे. तसेच, १९९३ पासून देण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यावर्षी मराठीतील ज्येष्ठ गझल गायक भीमराव पांचाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार १० लाख रोख रक्कम, मानचिन्ह, मानपत्र व शाल यांसह दिला जातो. सर्व पुरस्कारांचे वितरण २५ एप्रिल २०२५ रोजी एन.एस.सी.आय. डोम, मुंबई येथे एका भव्य समारंभात होणार आहे. या सोहळ्याशिवाय, संविधान अमृत महोत्सव आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभागातर्फे २० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे एक खास सांगीतिक मानवंदना कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सुरेश वाडकर, आदर्श शिंदे, वैशाली सामंत, उर्मिला धनगर, नंदेश उमक आदी कलाकार सहभागी होणार असून, सूत्रसंचालन सुबोध भावे करणार आहेत. कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीते, नाट्यप्रवेश व नृत्य सादर केले जातील. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, सन्मानिका प्रवेशपत्रे शिवाजी नाट्य मंदिर व रवींद्र नाट्य मंदिर येथे 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर वितरित केली जातील, अशी माहिती मंत्री ॲड. शेलार यांनी यावेळी दिली.

## पान १ वरून...

### एकच जिद्द शक्तिपीठ

गावांचे शेतकरी या ठिकाणी हजर झाले. या शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांसमोर जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे अधिकाऱ्यांना मोजणी करता आली नाही.

---------

### वक्फ कायद्यातील दोन तरतुदींना

त्यानंतर पाच दिवसांच्या आत न्यायालयाने याचिकाकर्त्यांना त्यांचा प्रतिवाद दाखल करण्याची परवानगी दिली. कायद्याच्या कलम ९ आणि १४ अंतर्गत केंद्रीय वक्फ परिषद आणि राज्य वक्फ बोर्डांमध्ये कोणत्याही नियुक्त्या केल्या जाणार नाहीत. याव्यतिरिक्त, पुढील सुनावणीच्या तारखेपर्यंत, कोणत्याही वक्फ मालमत्तेला - अधिसूचनेद्वारे वापरकर्त्यांने वक्फ म्हणून नोंदणीकृत किंवा घोषित केलेल्या मालमत्तेसह - अधिसूचित केले जाणार नाही किंवा नियुक्त कलेक्टरमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. न्यायालयाने हे विधान रेकॉर्डवर घेतले आहे.

------------

### राज्यातील कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या

मंत्रालयातून हालणारी सूत्रे आता आयुक्तांच्या हाती देण्यात आल्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. बदल्यांसाठी २००५ मध्ये राज्यात स्वतंत्र कायदा अस्तित्वात आला आहे. सध्या या कायद्याला छेद देणारा जीआर काढला गेला आहे.

-------------

### राष्ट्रपतींना आदेश, ही

करत त्यांनी न्यायव्यवस्थेतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जप्तीनंतर अजूनही त्या न्यायाधीशांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आलेली नाही. या देशात कुणाच्याही विरोधात अगदी माझ्याही विरोधात एफआयआर दाखल होऊ शकतो. पण न्यायाधीशांच्या बाबतीत थेट एफआयआर दाखल केला जाऊ शकत नाही, कारण न्यायपालिकेतील व्यक्तींकडूनच परवानगी लागते. हे तर संविधानात कुठेही लिहिलेले नाही, असे ते म्हणाले.

---------

### आरोपी दत्ता गाडेविरोधात

होती. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करत आरोपीला अटक केली. मात्र, अद्याप आरोपीचा मोबाईल पोलिसांच्या हाती लागलेला नाही, अशी माहिती तपासातील अधिकाऱ्यांनी दिली आहे. तर दोषारोपपत्रात घटनेचा तपशीलवार आढावा, साक्षीदारांचे जबाब, सीसीटीव्ही फुटेज, वैद्यकीय अहवाल आणि इतर पुरावे समाविष्ट करण्यात आले आहेत.

------------

### संतोष देशमुख प्रकरण : एसआयटीमध्ये

पोलिस नाईक अनिल मंदे यांचा समावेश केला आहे. सध्या पथकात राज्य गुन्हा अन्वेषण विभागाच्या छत्रपती संभाजी नगर येथील अपर पोलिस अधीक्षक किरण पाटील, गुन्हे अन्वेषण विभागाचे उपाध्यक्ष अनिल गुजर, राज्य गुन्हा अन्वेषण विभागातील पोलिस निरीक्षक सुभाष मुठे, राज्य गुन्हा अन्वेषण विभागाच्या पुणे येथील भरारी पथकाचे पोलिस निरीक्षक अक्षयकुमार ठिकाणे तसेच याच पथकातील पोलिस हवालदार शर्मिला साळुंखे व राज्य गुन्हा अन्वेषण विभागाच्या सीसीटीएनएस मधील पोलिस हवालदार दिपाली पवार यांचा समावेश होता. यामध्ये आणखी दोघांची वाढ झाली आहे.

------------

### बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबाची

होते, संघाचे संस्कार त्यांचेवर असल्याने प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याचा त्यांचा स्वभाव होता. माझ्या लोकसभा निवडणुकीत बुथ विस्तारक म्हणून अतिशय महत्वाची जबाबदारी त्यांनी खूप मेहनतीने पार पाडली. अशा मनमिळावू कार्यकर्त्याची अशा प्रकारे निर्घृण हत्या झाली हे ऐकून मनाला खूप वेदना झाल्या. या घटनेचा मी तीव्र निषेध करते. जिल्हयात आल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्या पत्नी व कुटुंबाची भेट घेणार आहे. त्यांच्यावर कोसळलेल्या दुःखात माझा परिवार सहभागी आहे. आगे यांच्या कुटुंबाची जबाबदारी मी घेणार असून त्यांना सर्वतोपरी मदत करेल असं ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

-----------

### पीओके रिकामा करावाच

कब्जा केलेली भाग (पाकव्याप्त काश्मीर) भारताला परत द्यावे लागणार आहे. कुठलीही परकीय गोष्ट शीरधमनीत कशी असेल? जम्मू-काश्मीर हा भारताचा केंद्रशासित प्रदेश आहे. पाकिस्तानशी याचे एकमेव नाते म्हणजे त्यांनी बेकायदेशीररित्या कब्जा केलेल्या भाग भारताला परत करणे. पाकव्याप्त काश्मीर म्हणजेच पीओके हा भूभाग पाकिस्तानचा नाही. पीओके हा भारताचा अविभाज्य भाग आहे. ते पाकिस्तानने बेकायदेशीरपणे व्यापलेले आहे. पाकिस्तानला कोणत्याही किंमतीत पीओके रिकामा करावाच लागेल.

------------

### कामगारांचे वेतन न वाढवणे

म्हणून घेत, काँग्रेस अध्यक्षांनी मोदी सरकारला गरीबविरोधी म्हटले. ते म्हणाले की, मोदी सरकार मनरेगा कामगारांवर अत्याचार करण्याचा प्रयत्न करत आहे. मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, केंद्राने आधार आधारित पेमेंटची अट लादून सुमारे ७ कोटी नोंदणीकृत कामगारांना मनरेगामधून वगळले आहे. यासोबतच, मनरेगाच्या अर्थसंकल्पात गेल्या १० वर्षांतील एकूण अर्थसंकल्पात सर्वात कमी वाटप झाले आहे. असे करून मोदी सरकारने मनरेगावर सतत हल्ला केला आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. १८ एप्रिल २०२५



## पुरूषोत्तमपुरी सज्ञाचे तलाठी हजारे यांची बदली करा – उपविभागीय अधिकाऱ्यांकडे मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी सज्जाचे तलाठी एस. जी. हजारे हे सज्जावर सतत गैरहजर राहत असल्याने शेतक–यांची गैरसोय होत आहे. त्यामुळे तलाठी हजारे यांची बदली करा अशी मागणी बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे आज दि.१७ एप्रिल २०२५ रोजी निवेदनाव्दारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी सज्जाचे तलाठी एस. जी. हजारे सतत गैरहजर असतात. कार्यालयात येत नाहीत परिणामी शेतकरी वर्ग, शेतमजुर, विद्यार्थी यांची हेळसांड होत आहे. याचा विचार करून सदरील तलाठ्याची बदली करावी. येत्या सात दिवसात बदली न झाल्यास पुरूषोत्तमपुरी येथील शेतक–यांच्या वतीने आंदोलनाचा ईशाराही देण्यात आला आहे. निवेदनावर बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अधिसूचित सेवा उपलब्ध करण्यात दिरंगाई करणाऱ्या विभाग प्रमुखांना दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावणार – मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत १०२७ सेवा अधिसूचित केल्या असून त्यापैकी ५२७ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिसूचित सेवा पोर्टलवर उपलब्ध करून द्याव्यात. यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखाला दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिवांना केल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात विविध सामाजिक क्षेत्रांची वॉररुम बैठक पार पडली. या बैठकीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कार्यान्वयन, ॲग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा घेण्यात आला.

राज्यातील नागरिकांना पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, आपले सरकार पोर्टलवर विविध विभागांच्या १३८ इंटिग्रेटेड सेवा ३१ मे २०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन कराव्यात. याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन सेवा उपलब्ध करण्यास दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांवर दरदिवशी एक हजार रुपयांचा दंड लावण्याची कारवाई करण्यात यावी. यासंदर्भात मुख्य सचिवांनी परिपत्रक काढावे, असे निर्देशही त्यांनी दिले. सेवा हक्क अधिनियमासंदर्भात पुढील प्रक्रिया राबविताना कोणकोणत्या नवीन सेवा अधिसूचित करता येतील, याबाबत १५ सप्टेंबरपर्यंत माहिती द्यावी. सेवा ऑनलाईन करण्याच्या प्रक्रियेचे प्रमाणीकरण करण्याची कार्यवाही 'महाआयटी'ने करावी. एका अर्जाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ घेता यावा यादृष्टीनेही प्रक्रियेत बदल करावा. ऑक्टोबरपर्यंत जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आपला महाराष्ट्र देशात अव्वल व्हावा यादृष्टीने प्रयत्न करावा, असेही मुख्यमंत्री म्हणाले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे ट्रॅकिंग प्रणाली आणखी मजबूत करा– मुख्यमंत्री आदिवासी, शेतकरी, विद्यार्थी यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान करतानाच त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा–लाभांच्या स्थितीची रिअल टाईम माहिती उपलब्ध होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ट्रॅकिंग प्रणाली आणखी मजबूत करण्यावर भर द्या, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



आदिवासी विकास विभागाच्या योजनांचा आढावा घेताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आदिवासी कुटुंबांना योजनांचा लाभ देण्यासह त्यांच्या वाड्या–पाड्यांना पायाभूत सुविधा देण्याच्या कामास गती देण्यात यावी. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत येणारी सर्व उद्दिष्ट्ये वर्ष २०२६ अखेर पूर्ण करावीत. आदिवासी भागातील मोबाईल मेडिकल युनिटचे जिओटॅगिंग करावे, घरोघरी नळ योजनेसाठी ग्रामसभेचा ठराव घ्यावा. पूर्ण झालेली बहुद्देशीय केंद्रे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करा. आदिवासी बांधवांना पक्की घरे बांधून देण्याच्या कामाला गती द्या. जमीन अधिग्रहणासाठी आदिवासी विकास विभागाने विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून देऊन उर्वरित रस्ते पूर्ण करून घ्यावेत. नाशिक, नंदुरबार, पालघर, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बांधवांचे दावे लवकरात लवकर निकाली काढून त्यांच्या नावावर ७/१२ करून देण्यात यावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. 'प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियाना'तून आदिवासी भागात परिवर्तन करता येणार– मुख्यमंत्री गेल्या वर्षीच्या २ ऑक्टोबरला केंद्र शासनामार्फत सुरु करण्यात आलेल्या 'प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियाना'ची ( –) अंमलबजावणी राज्य शासनाच्या १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत करण्यात यावी. आदिवासी बांधवांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आखण्यात आलेल्या या योजनेतून आदिवासी भागात परिवर्तन करता येणार आहे. त्यामुळे आदिवासी लोकसंख्या असलेल्या ३२ जिल्ह्यांमध्ये या अभियानाची प्रभावीपणे कार्यवाही करावी. जिल्हास्तरीय समित्यांच्या माध्यमातून विविध १७ प्रशासकीय विभागांमधील २१ उपक्रमांची वाड्या–पाड्यांपर्यंत अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या भविष्यातील विस्तारासाठी किमान २० एकर जागा राखीव ठेवण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्यातील १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या कार्यान्वयनाचा आढावा घेतला. या महाविद्यालयांच्या उभारणीला गती देण्यासाठी त्यातील अडचणी तातडीने सोडविण्याच्या संबंधितांना सूचना केल्या. अंबरनाथ, वर्धा, पालघर येथील महाविद्यालयांसाठी जागा निश्चित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. भविष्याचा विचार करूनच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची उभारणी केली पाहिजे. महाविद्यालयांना जागा उपलब्ध करून देताना भविष्यात त्यांचा विस्तार करता यावा यासाठी किमान २० एकर जागा राखीव ठेवावी. नवीन महाविद्यालयांसाठी १४८९ पदांची मागणी करण्यात आली असून त्यापैकी ३०० पेक्षा जास्त पदे अजूनही भरली गेली नाहीत. त्यामुळे एमपीएससीमधून तांत्रिक पदे वगळण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीसमोर आणावा, असे निर्देशही श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. 'ॲग्रीस्टॅक'च्या नोंदणीत देशात तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या महाराष्ट्राला 'शेतकरी ओळखपत्र नोंदणी'त पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी नोंदणीची प्रक्रिया गतिमान पद्धतीने राबवावी. शेतकऱ्यांची नोंदणी, हंगामी पिकांची माहिती, ई–पिक पाहणी, गाव नकाशांची माहिती उपलब्ध करताना अचुकता व गुणवत्तेवर भर द्यावा. ॲग्रीस्टॅकच्या अद्ययावतीकरण आणि वापराबाबत यंत्रणा उभारावी, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिले.'ॲग्रीस्टॅक' उपक्रमांतर्गत १ कोटी १९ लाख शेतकरी ओळखपत्र नोंदणीचे उद्दिष्ट असून आतापर्यंत ९२ लाख ३५ हजार शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. कृषी गणना २०२१–२२ नुसार १ कोटी ७१ लाख १० हजार ६९७ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येत असून त्यापैकी ७८ लाख ७५ हजार ४७७ शेतकऱ्यांची नोंदणीही ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावा, असे मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले. यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मेघना बोर्डीकर, योगेश कदम यांच्यासह वरिष्ठ सनदी अधिकारी, जिल्हाधिकारी आदी उपस्थित होते.

## श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयात रंगोत्सव इंटरनॅशनल आर्ट कॉम्पिटिशनचा निकाल जाहीर

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालूक्यातील पिंपळवंडी येथिल श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी इंटरनॅशनल स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला.या स्पर्धेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.शेळके अमृता अंबादास वर्ग ५ वी हस्ताक्षर स्पर्धा ग्रेड ए प्लस रँक सेकंड प्राईस अवार्ड मल्टी कलर एलसीडी राइटिंग पॅड विथ ट्रॉफी, पवार श्रेया महेश वर्ग ११ वी कोलाज मेकिंग स्पर्धा ग्रेड विथ ट्रॉफी प्रॅक्टिकलर परफॉर्मन्स अवॉर्ड,भालेकर दिव्या ज्ञानेश्वर वर्ग ७ वी हस्ताक्षर स्पर्धा ग्रेड बी प्लस इंटरनॅशनल मेडल,पोकळे वैष्णवी



गोकुळ वर्ग ६ वी हस्ताक्षर स्पर्धा ग्रेड बी प्लस इंटरनॅशनल मेडल,पवार मयुरी संजय वर्ग ११ वी हस्ताक्षर स्पर्धा ग्रेड बी प्लस मेडल इंटरनॅशनल मेडल,सृष्टी बापूराव बांडराव वर्ग ७ वी ग्रेड बी कंनसोलेशन प्राईज विथ सुपर प्राईज गिफ्ट,तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयामध्ये इंटरनॅशनल लेवल आर्ट कॉम्पिटिशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कलाशिक्षक बांडराव सर विद्यार्थ्यांचा सराव घेऊनच या स्पर्धेत विद्यार्थी प्रविष्ट करतात.त्या विद्यार्थ्यांच्या कला गुणांना अधिक अधिक विकसित होऊन एक जागतिक पातळीवरचे सर्वश्रेष्ठ कलाकार निर्माण व्हावेत असे स्वप्न रंगोत्सव,सेलिब्रेशन अँड ऑर्गनायझेशन लेव्हल आर्ट कॉम्पिटिशन या संस्थेचे अध्यक्ष माननीय संग्राम दाते यांचे आहे. माननीय प्राचार्य पवार ए.एम.सर या स्पर्धा परीक्षा घेण्यास उत्साही राहून या कामी मदत करत असतात. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा महंत ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज, मुख्याध्यापक ए.एम.पवार सर, कलाशिक्षक बांडराव सर, सचिव पवार प्रताप सर,जरे सर,भोसले सर,नजान सर, डिसले सर,डांभे सर,लाड सर, मुळे सर, शिंदे सर,व शिक्षिका पोकळे मॅडम, गाडे मॅडम,चौधरी मॅडम, विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील मौजे कवडगाव (बु.)येथील जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव विद्यालयात महामानव,ज्ञानाचा अथांग सागर, मानवाला मानव म्हणून जगण्याचा अधिकार देणा–या,शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश देणारे, प्रज्ञावंत शिलवंत करुणेचा महासागर, न्याय बंधुत्व समता यांचे पुरस्कर्ते महामानव, भारतरत्न, विश्वरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त त्यांच्या पावन प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन



करण्यात आले.सदरील कार्यक्रमासाठी संस्थेचे मा.अध्यक्ष,सचिव पदाधिकारी, गावातील मा.सरपंच ,उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य, तसेच गावातील भीम जयंती उत्सव मंडळ अध्यक्ष सदस्य सर्व ज्येष्ठ प्रतिष्ठित नागरिक,शिक्षण प्रेमी,पालक वृंद, माजी विद्यार्थी मंडळ व विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद सर्व उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक प्राचार्य श्री. सारोक्ते डी.जी हे होते. तर प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित गावातील सर्व मान्यवर श्री.रावसाहेब (जिजा) राऊत ,श्री.महादेव साळवे, श्री.आत्माराम (दादा) मांजरे, श्री.आकाश साळवे, श्री.रितेश राऊत, लखन राऊत, रवी घावरे, दिनेश राऊत, दत्ता राऊत व इतर सर्व मान्यवर ग्रामस्थ, पालक वृंद,माजी विद्यार्थी मंडळ आदी सर्व उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाची सुरुवात ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन प्रतिमेचे पूजन हार,पुष्प अर्पण करून त्यांच्या पावन प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न, भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम.तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद घाडगे सर, टाळे सर, हंगे सर, यादव सर,मुंडे सर, तौर मॅडम, येवले सर, चोपडे सर,गोंद्रे जी.एम आदी सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# पिंपळनेरच्या अविस्मरणीय नारळी सप्ताहाचा समारोप !

**महाराष्ट्रातून अफाट जनसागर ,महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन तर उत्तराधिकारी यांचे हस्ते दहीहंडी फोडली !**

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपळनेर येथे गेली सात दिवसांपासून ऐश्वर्य संपन्न संत भगवान बाबांनी प्रारंभ केलेल्या ९१ व्या नारळी सप्ताहाचा काल्याच्या किर्तनाने समारोप झाला ,संपुर्ण महाराष्ट्रातून भाविकाचा जनसागर उसळला होता .महंत न्यायाचार्य डॉ नामदेव महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन व उत्तराधिकारी कृष्णा महाराज शास्त्री यांचे हस्ते दहीहंडी फोडून अवघ्या अर्ध्या तासात लाखाच्या जनसमुदायाला महाप्रसाद देण्यात आला जागेवरच पाण्याची बाटली सुध्दा पोहच करण्यात आली होती.

ऐश्वर्य संपन्न संत भगवान बाबा यांनी प्रारंभ केलेला नारळी सप्ताहाचे नारळ पिंपळनेरकरांनी आणला अत्यल्प काळात संपुर्ण नियोजन करून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का देऊन ईच्छाशक्ती व आपली भावना असेल तर अशक्य असणारे शक्य होते हे दाखवून दिले.

कीर्तन मंडप खुला ,कथा मंडपात पंखे कुलर आणि पंन्नास एकरावर विद्यूत रोषणाईचा छगमगाट होता .कुठेही बसलो तरी आवाज तिथपर्यंत पोहचत होता .महिला भाविकासाठी विशष दक्षता घेतली जात होती .

**महाप्रसादाबरोबर पाण्याची बाटली जागेवर पोहच !**

सात दिवस वेगवेगळी मेजवानी देऊन ज्ञानदानाबरोबर अन्नदानाचा वेगळेपणा दाखवून दिला .

शांतता आणि सुव्यवस्था !

कथा मंडप व कीर्तन मंडपात कार्यक्रम सुरू असतांना शांतता आणि सुव्यवस्था लक्षवेधी होती .

रखरखते ऊन्हाचा त्रास

नको म्हणून सावलीसाठी रात्रीतून मोठा मंडप उभारला त्यामुळे कीर्तन आणि प्रसाद सावलीतच मिळाला .

**गडाला जातीत बांधू नका !**

भगवान गड हा सर्व जाती धर्माचा असुन ईथे अध्यात्मिक शिक्षणाबरोबर एमपीएससी युपीसी अभ्यास करण्यासाठी सर्वच विद्यार्थ्याचा समावेश आहे . कुणीही भगवान गडाला जातीच्याबंनात अडकवू नका असे डॉ नामदेव शास्त्रींनी सांगितले .पिंपळनेरकरांनी सप्ताह लक्झरी केला असी शाब्बासकिची थाप दिली .

**राजकिय नेत्यांची दर्शनी उपस्थिती !**

नारळी सप्ताहात मा.मंत्री धनंजय मुंडे येणार होते मात्र ते आले नसल्याने ते काय बोलतात याची उत्सुकता संपुष्टात आली तर आ.सुरेश धस हे रात्री येऊन भेट देऊन गेले शिवाय विजयसिह पंडीत , मा.आ.बाळासाहेब आजबे ,प्रा.टी पी मुंडे ,प्रा .लक्ष्मण हाके ,महेबुब शेख ,सिंदखेड राजा चे आ.मनोज कायंदे ,प्रा सुशिला मोराळे आदिंनी दर्शनी उपस्थिती लावली होती ग्रामस्थाकडून त्यांचा मानसन्मान करण्यात आला. कीर्तन मंचावर कुणाचेही भाषण झाले नाही. मंडपातच शास्त्रिजीसह सर्व महाराज मंडळी व साधक वर्ग या सर्वांनी कीर्तऩ व्यासपिठावरच प्रसाद घेतला .

## ब्रह्माकुमारीजच्या मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी रतनमोहिनी यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ब्रह्माकुमारीजच्या मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी रतनमोहिनी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या आठवणी व सेवा कार्याचे स्मरण करण्यासाठी ब्रह्माकुमारीज, आनंद सरोवर, अंबाजोगाई येथे मंगळवार, दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ या वेळेत राजयोगिनी ब्रह्माकुमारी उषा दीदी (आंतरराष्ट्रीय राजयोगा मोटिवेशनल स्पीकर, माऊंट आबू, राजस्थान) यांचे प्रवचन होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ ते ८.३० या वेळेत श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती अंबाजोगाई सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना अंबाजोगाई सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी सांगितले की, श्रद्धांजली सभेसाठी बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व्यवस्थापन प्रतिनिधी अर्चनाताई आडसकर आणि राजयोगिनी ब्रह्माकुमारी उषा दीदी (आंतरराष्ट्रीय राजयोगा मोटिवेशनल स्पीकर, माऊंट आबू, राजस्थान) हे अतिथी उपस्थित राहणार आहेत. तरी श्रद्धांजली सभेसाठी उपस्थित रहावे असे आवाहन अंबाजोगाई सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी केले आहे.



ब्रह्माकुमारीजच्या आध्यात्मिक प्रमुख राजयोगिनी दादी रतनमोहिनीजी यांचा संक्षिप्त कार्य परिचय

ब्रह्माकुमारीजच्या आध्यात्मिक प्रमुख राजयोगिनी दादी रतन मोहिनी यांचे नुकतेच वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले. त्यांनी जवळजवळ नऊ दशकांपर्यंत सेवा, शांती आणि आध्यात्मिक मार्गदर्शनाचा वारसा मागे सोडला. ब्रह्माकुमारी आध्यात्मिक संघटनेच्या मुख्य प्रशासक दादी रतन मोहिनी यांच्या निधनाने भारत शोकाकुल आहे. त्यांच्या प्रगल्भ आध्यात्मिकता, दयाळू नेतृत्व आणि सामाजिक सुधारणांप्रती अढळ वचनबध्दतेसाठी आदरणीय असलेल्या दादी रतन मोहिनी यांनी वयाच्या १०१ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने ब्रह्माकुमारींसाठी आणि त्यांच्या जीवनातून आणि शिकवणींपासून प्रेरणा घेतलेल्या लाखो लोकांसाठी एका युगाचा अंत झाला. ब्रह्माकुमारी आदरणीय दादीजी यांचे निधन हे सर्वांसाठी खूप दु:खद आहे. त्यांनी आयुष्यभर हजारो तरूण बहिणींना प्रशिक्षण देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय संस्कृती आणि मूल्यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक पदयात्रा केल्या. दादी रतन मोहिनीजी यांनी चार वर्षांपूर्वी त्यांच्या पूर्वसुरी दादी हृदयमोहिनी यांच्या निधनानंतर ब्रह्माकुमारींच्या मुख्य प्रशासकाची भूमिका स्वीकारली. त्यांनी यापूर्वी चार दशकांहून अधिक काळ संघटनेच्या युवा शाखेच्या प्रमुख म्हणून काम केले होते, या काळात त्यांनी तरूणांच्या एका पिढीला आध्यात्मिक आणि मूल्यांवर आधारित जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित केले. त्यांच्या सर्वांत उल्लेखनीय कामगिरीपैकी एक म्हणजे २००६ मध्ये भारतभर मोठ्या प्रमाणात युवा मोर्चाचे नेतृत्व करणे, ज्याची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली. २५ मार्च १९२५ रोजी हैद्राबाद, सिंध (आता पाकिस्तान मध्ये) येथे जन्मलेल्या दादी रतन मोहिनी वयाच्या १३ व्या वर्षी ब्रह्मा कुमारींमध्ये सामील झाल्या. त्यांच्या ८८ वर्षांच्या आध्यात्मिक प्रवासात, त्या संस्थेच्या मध्यवर्ती स्तंभांपैकी एक बनल्या, त्यांनी विस्तार आणि सामाजिक संपर्काच्या प्रमुख टप्प्यांतून संस्थेचे मार्गदर्शन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली, ब्रह्मा कुमारींनी महिला सक्षमीकरण, युवा विकास, व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन आणि योगिक शेती यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या मोहिमा सुरू केल्या. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे त्यांना २०१४ मध्ये गुलबर्गा विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेटसह अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले होते. दादी यांनी यज्ञ (ब्रह्माकुमारी) च्या मुख्य प्रशासकीय प्रमुख म्हणून सुमारे चार वर्षे काम केले. त्यांनी पुढील पदांवरही काम केले आहे. ज्यात राजयोग एज्युकेशन ॲण्ड रिसर्च फाऊंडेशनच्या युवा शाखेचे अध्यक्ष, माऊंट आबू येथील बीके मुख्यालयाच्या कार्मिक विभागाचे संचालक., राजस्थान झोन मधील ब्रह्माकुमारी केंद्रांचे विभागीय प्रमुख, भारतातील शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालक म्हणून सातत्यपूर्ण कार्य केले. त्यांचे गुणविशेष असे की, त्या एक श्रेष्ठ विचारवंत, कोणत्याही आध्यात्मिक विषयावरील अंतर्दृष्टीपूर्ण वक्ता, दयाळूपणा, खूप नम्र, सेवेसाठी सदैव तयार आध्यात्मिकदृष्ट्या परिपक्व नेहमी हसणारा सर्वांना आनंदी करते. दादी पवित्रता, शांती आणि उदात्त उद्देशाच्या जीवनाचे उदाहरण देतात. रतन मोहिनीजी दादी यांना अनेकजण आदर्श ब्रह्माकुमारी म्हणून पाहतात हे विशेष होय.

पान ६ वरून...

### महाराणी ताराबाईंच्या

चि.बोंगार्डे सौजन्य,कु.चौरे अक्षरा,चि.उजगरे कार्तिक,कु.कप्पे हर्षदा या १४ गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह बुक देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या १४ विद्यार्थ्यांना पुढील पाच वर्षाच्या शिक्षणासाठी आठ लक्ष चाळीस हजार (८४०,०००) रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.एनएमएमएस परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे विभाग प्रमुख चव्हाण बी.बी.,श्री.चांदणे सर,श्री.राऊत एम.बी.,श्री.गिलबिले सर,श्री.मुंडे ए.बी.,श्री.डमरे सर,श्रीमती मंत्रे मॅडम यांचे मा.संजयभाऊ आंधळे तसेच प्राचार्य राऊत डी.डी.,उपप्राचार्य मस्के सर यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर,श्री.डोईफोडे सर,प्रमुख वक्त्या श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने विचार व्यक्त करून गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले त्यानंतर अध्यक्ष समारोपर विचार व्यक्त करताना मा.संजयभाऊ आंधळे म्हणाले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे भारत देश आज एक संघ आहे त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करून त्यांनी जयंतीच्या शुभेच्छा दिल्या तसेच एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या सर्व विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी. यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा.मुंडे सी.व्ही.यांनी मानले.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थी, पालक,शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

### सायगाव तलाठी कार्यालय

ग्रामपंचायत सदस्यांनी तलाठी कार्यालय पाडण्याचा किंवा पडलेले मटेरियल बाजूला सारण्याचा कुठलाही ठराव घेतला नसल्याची माहिती चौकशी समितीला दिली आहे मात्र सरपंच कैलास मस्के हे चौकशी समिती ला उडवा उडवी ची उत्तरे देताना प्राथमिक दृष्टया दिसून आहे तब्बल ३ वेळा त्यांनी त्यांचा जबाब बदलला असून तलाठी कार्यालयाची इमारत पडली असून असलेले मटेरिअल स्वतः सरपंच कैलास मस्के यांनी बाजूला सारल्याची कबुली त्यानी चौकशी समिती ला दिली मात्र कोणतीही शासकीय इमारत पाडली अथवा पडली असेल तर प्रशासनास कळवावे लागते मात्र सरपंचाने प्रशासनास इमारत पडल्याची माहिती लपवल्याने संशयाची सुई गवगवते त्याचबरोबर लोखंडी गजाचे भंगार, दरवाजे, खिडक्या व ईतर साहित्य त्या ठिकाणी दिसून आले नाही ते सरपंचांनी विक्री केले आहेत का हाही प्रश्न पडतो मुळात शासकीय कार्यालय बेकायदेशीर विना परवानगी पाडणे अथवा इमारत पडल्यानंतर ते प्रशासनाला न कळवणे हा गंभीर गुन्हा आहे चौकशी समिती ने तब्बल पाच ते सहा तास कसून चौकशी केली असून ही समिती सरपंचांवर गुन्हे दाखल करून कारवाई करेल का याकडे सायगाव ग्रामस्थांचे तसेच बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

cmyk

# केंद्रीय कृषिमंत्र्यांनी ब्राझीलमध्ये दिली सोयाबीन, टोमॅटो आणि मक्याच्या शेतीला भेट

नवी दिल्ली : केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान ब्राझीलमधील सोयाबीन उत्पादन संयंत्र आणि टोमॅटो शेतीला भेटी दिली आहे. कृषिमंत्री सध्या ब्रिक्स देशांच्या १५ व्या बैठकीसाठी ब्राझीलच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी ब्राझीलमध्ये अवलंबल्या जाणाऱ्या यांत्रिकीकरण आणि सिंचनाच्या नवीन पद्धती यावेळी पाहिल्या. नवीन पद्धतींमुळे भारतीय शेतकऱ्यांना आणखी कसा फायदा होऊ शकतो, अशी माहिती चौहान यांनी गुरुवारी (दि.१७) घेतली.

यावेळी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी भारतातील सोयाबीन क्षेत्राबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच भारतात सोयाबीनचे उत्पादन कसे वाढवता येईल आणि ब्राझीलसोबत केवळ उत्पादनातच नव्हे तर प्रक्रिया क्षेत्रातही एकत्र काम कसे करता येईल, यावर मत मांडले. चौहान म्हणाले, ''सध्या भारत ब्राझीलमधून सोया तेल आयात करतो, परंतु आपण गुंतवणूक करू शकतो. आणि सोया प्रक्रिया प्रकल्प देखील उभारू शकतो. जर सोया तेल उपलब्ध असेल तर ते भारतातून निर्यात देखील करता येईल.



केवळ सोयाबीनच्या क्षेत्रातच नाही तर यांत्रिकीकरणाच्या क्षेत्रातही जवळजवळ १००% यांत्रिकीकरण झाले आहे.'' असेही चौहान यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले, ''जर कापूस वेचायचा असेल तर तो थेट कापणी यंत्रातून काढला जातो. येथे सुरू असलेले संशोधन आणि अभ्यास भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीएआर) सहकार्याने केले पाहिजेत. जेणेकरून आपण चांगले बियाणे कसं तयार करू शकतो, हे शोधता येईल.'' यावेळी अनेक विषयांवर चर्चा झाल्याचे चौहान म्हणाले. भारत आणि ब्राझीलमध्ये व्यापारी सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात येणार असल्याचे चौहान म्हणाले. मी ब्राझीलच्या एका शिष्टमंडळाला सर्व शक्यतांचा शोध घेण्यासाठी आमंत्रित केले आहे. भारताकडूनही पूर्ण सहकार्य मिळेल आणि दोन्ही देश आणि येथील व्यापारी समुदाय भारतासोबत व्यापार, तंत्रज्ञान इत्यादी प्रभावीपणे वाढविण्याचा गांभीर्याने विचार करतीलच, शिवाय वेगाने पुढे जातील असा पूर्ण विश्वास असल्याचं चौहान यांनी प्रतिपादन केले. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह यांनी ब्राझीलच्या कृषिमंत्र्यांसोबत ब्राझीलमधील टोमॅटो फार्म हाऊसला भेट दिली. यावेळी शिवराज सिंह म्हणाले की, ''मी येथे मक्याची लागवड पाहिली. टोमॅटोची लागवड आणि या जाती देखील वेगळ्या आहेत. एक जात विषाणूच्या हल्ल्याला बळी पडते, तर दुसरी जात सुरक्षित असते. ब्राझीलमध्ये पूर्णपणे यांत्रिकीकरण झाले आहे. ब्राझीलमध्ये प्रति हेक्टर २२ टन उत्पादन मिळते, जे खरोखरच आश्चर्यकारक असल्याचे मत चौहान यांनी व्यक्त केले. दरम्यान, ब्राझीलमधील शेती तंत्रज्ञान भारतात कसे आणता येईल, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे चौहान म्हणाले. तसेच ब्राझीलमधील सिंचन, यांत्रिकीकरण आणि शेती तंत्रज्ञानावर सकारात्मक चर्चा झाल्याचे चौहान यांनी सांगितले.

## उष्णतेचे आंब्यावर होणारे दुष्परिणाम : संरक्षण आणि उपाय



सध्या राज्यात उष्णतेत वाढ होताना दिसत आहे. विविध फळबागेत यामुळे दुष्परिणाम दिसून येत आहेत. विशेषत: आंबा फळपिकाचे यामुळे नुकसान होताना दिसत आहे. जर तुम्हाला उष्णतेच्या लाटेपासून आंब्याचे संरक्षण करायचे असेल तर तुम्ही तुमच्या आंबा बागेत काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. जेणेकरुन त्यांच्यावर वेळीच उपचार करून चांगले उत्पादन घेऊन ताजे आंबे मिळू शकतील.

उन्हाळयात आंबा खायला जवळपास सर्वांनाच आवडतो. उष्मा वाढला की बाजारात आंब्याची मागणीही वाढते. पण तुम्हाला माहीत आहे का की आंब्यालाही माणसांप्रमाणेच उष्माघाताचा त्रास होतो. आता हे कसे घडू शकते असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. फळाला उष्माघात कसा होऊ शकतो? पण हे पूर्णपणे खरे आहे. फळांचा राजा म्हटल्या जाणाऱ्या आंब्यालाही उष्माघाताचा झटका बसतो. उष्माघातामुळे आंब्याचा आकार लहान होऊन तो सुकायलाही लागतो. त्याचप्रमाणे आंबा झाडावर असताना त्या काळात फळाला उष्माघात झाला तर तो सुकून अकाली गळून पडतो. अशा परिस्थितीत आंब्याला उष्माघात झाल्यास शेतकऱ्यांनी काय करावे हे जाणून घेऊया.

उष्माघाताचे आंब्यावर परिणाम : हवेतील ओलावा नसल्यामुळे आंब्याच्या फळांमध्ये उष्णतेची लाट येण्याच्या तक्रारी वारंवार दिसून येतात. यामुळे खालील प्रमाणे परिणाम दिसतात.

आंब्याच्या उष्णतेमुळे फळे लवकर फुटतात. उष्माघातानंतर आंब्यात गोडवा उरला नाही. आंब्याचा आकारही लहान राहतो.

उष्णतेच्या लाटेपासून आंब्याचे संरक्षण उपाय : उष्माघातापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी, बागेत स्प्रिंकलरने फवारणी करावी. जेणेकरून फळांमध्ये ओलावा टिकून राहील. याशिवाय आवश्यकतेनुसार आंबा बागेत ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा, जेणेकरून झाडांना सतत सिंचन होत राहते. उष्णतेच्या लाटेपासून आंबा बागेचे आणि फळांचे संरक्षण करण्यासाठी औषधांची फवारणी करणे शक्य नाही. आंबा बागेत ओलावा जितका जास्त असेल तितकी फळे उष्णतेपासून सुरक्षित राहतील. त्यामुळे शेतकर्यांनी आंबा बागांना वेळोवेळी पाणी द्यावे. आंब्याच्या बागांना वेळोवेळी पाणी दिल्यास आंब्याचे उत्पादन आणि फळांचा आकारही वाढतो.

## जाणून घ्या जमीन सपाटीकरण करणारी यंत्रे

जमीन सपाटीकरणाच काम हे तस खूप वेळखाऊ असते. आपल्याकडे जमीन लेव्हल करण्यासाठी फक्त जेसीबी आणि लेव्हलरचा वापर केला जातो. पण यापेक्षाही चांगली यंत्रे विकसीत झाली आहेत. ज्यामुळे सपाटीकरणाच काम सहज आणि चांगले प्रकारे होते.

ट्रॅक्टरचलित लेझर लँड लेव्हलर : ट्रॅक्टरचलित लेझर द्वारे नियंत्रीत केले जाणारे लेव्हलर हे पुर्णपने ॲटोमॅटीक पद्धतीने चालते. या तंत्रामध्ये जमिनीच्या सपाटीकरणाची अचूक पातळी राखली जाते. हे यंत्र संपूर्णपणे स्वयंचलित असल्यामुळे ऑपरेटरवर कमी भार येतो.या तंत्रज्ञानामध्ये प्रकाश किरण उत्सर्जित करण्यासाठी एक ट्रान्समीटर युनिट वापरतात, त्याला लेझर ट्रान्समीटर म्हणतात. जे शेतात १००० मीटर व्यासापर्यंत वर्तुळाकार प्रकाशकिरण सोडते. लेझर ट्रान्समीटर हे वेगवेगळ्या क्षमतेचे असतात. हे किरण लेव्हलर वर बसवलेल्या लेझर रिसीव्हरद्वारे मिळतात. मिळालेले सिग्नल हे लेव्हलर ब्लेड खाली वर करून जास्तीची माती समपातळीत पसरवते.लेझर लँड लेव्हलर वापरण्याआधी शेताची मशागत करून साधी फळी मारली जाते. जेणे करून यंत्रणेने माती काढण सोपे होईल.

टेरेसर ब्लेड लेव्हलर : सपाटीकरणासाठी वापरल जाणार दुसर यंत्र आहे टेरेसर ब्लेड लेव्हलर. हे ट्रॅक्टरचलीत अवजार असून जमिनीचा उंच सखलपणा खाच खळगे एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर माती सहज ओढून नेऊन भरता येते. त्यामुळे जमीन सपाट होऊन जमीन पीक पेरणीसाठी योग्यरीत्या तयार होते या अवजाराने एका दिवसाला ४ ते ५ हेक्टर जमीनीचे सपाटीकरण करता येऊ शकते. हे लेव्हलर १.५ ते ३ मीटर रुंदी पर्यंत उपलब्ध आहे.

ट्रॅक्टरचलीत हायड्रोलीक लेव्हलर : जमीनीच्या सपाटीकरणासाठी वापरली जाणारी मोठमोठी मशीनरी आणि त्यावर होणारा खर्च कमी करण्यासाठी ट्रॅक्टरचलीत हायड्रोलीक लेव्हलर चा वापर करता येतो. या यंत्राने सपाटीकरणासोबतच शेतातील बांधबंदिस्ती , शेतातील कचरा साफ किंवा जमा करण अशा कामासाठी देखील याचा वापर होऊ शकतो. याशिवाय थोड्याशा जमीनीच्या सपाटीकरणासाठी बैलचलीत लाकडी फाटा यासारखी यंत्रेही आहेत.

जमीन सपाटीकरणाचे फायदे : जमीन जर चढ-उताराची असेल तर पिकाला सम प्रमाणात पाणी दिलें जात नाही. त्यामुळे दिलेल पाणी शेताच्या शेवटच्या टोकापर्यंत पोहोचण्यास जास्त वेळ लागतो. शिवाय पाणी देखील जास्त द्याव लागते. याउलट काही ठिकाणी पावसाचे पडणारे पाणी हे पिकाच्या मुळाजवळ साचून राहते. पावसाचे पाणी किंवा सिंचनाचे पाणी जर पिकाच्या मुळाजवळ साचून राहिले तर रोपे पिवळी पडेणे कुजणे, रोपांची मर होणे किंवा रोपे खराब होणे यासारख नुकसान होते. पण जर जमिनीचे योग्य सपाटीकरण केले की जमिनीवरील मातीची उलटा पालट होऊन सुपीक मातीचा थर तयार होतो. त्यामुळे पिकाला योग्य प्रमाणात ऑक्सिजनचा पुरवठा होऊन पिकाची वाढ होते. पिकाची एकसमान वाढ होऊन तणांचा प्रादुर्भाव कमी राहतो. त्यामुळे पिकाच्या चांगल्या वाढीसोबतच उत्पादन आणि गुणवत्तेतही चांगला फरक दिसून येतो. त्यामुळे तुमची जमीन जर चढ उताराची असेल तर अशा जमीनीचे सपाटीकरण केले तर त्याचा निश्चितच फायदा होतो.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३३६ : दक्षिणेमध्ये विजयनगर हिंदू राज्याची स्थापना झाली.
१३३६ : हरिहर व बुक्क यांनी विजयनगरच्या हिंदू राज्याची स्थापना केली.
१७०३ : औरंगजेबाने सिंहगड ताब्यात घेतला.
१७२० : शाहू छत्रपती यांच्याकडून पहिले बाजीराव पेशवे यांना कर्‍हाडनजीक मसूर येथे पेशवाईची वस्त्रे मिळाली.
१८३१ : 'यूनिव्हर्सिटी ऑफ अलाबामा' ची स्थापना झाली.
१८५३ : मुंबईहून ठाण्यापर्यंत नियमित रेल्वे सेवा सुरू झाली.
१८९८ : जुलमी प्लेग अधिकारी रँड याचा खून करणारे दामोदर चापेकर यांना फाशी
१९१२ : टायटॅनिकमधील वाचलेले ७०५ प्रवासी घेउन आर.एम.एस. कार्पेथिया जहाज न्यूयॉर्कला पोचले.
१९२३ : पुण्याच्या शिवाजी मंदिरात शिवजयंतीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संगमरवरी अर्धपुतळ्याची स्थापना. हा राज्यातील पहिला शिवपुतळा. या पुतळ्याचे अनावरण मंदिराचे देणगीदार दिवंगत गणेश गोखले यांचे चिरंजीव डॉक्टर महादेव गोखले यांच्या हस्ते करण्यात आले.
१९२४ : सायमन व शूस्टर यांनी पहिले शब्दकोड्यांचे पुस्तक प्रकाशित केले.
१९३० : क्रांतिकारकांनी चितगाव येथील शस्त्रागार लुटले.
१९३० : आज काहीही बातमी नाही असे बी. बी. सी. या नभोवाणी केंद्रावरुन सांगण्यात आले.
१९३६ : पेशव्यांची राजधानी असणार्या पुण्यातील शनिवारवाडा पुरातत्व विभागाकडे सुपूर्त करण्यात आला.
१९५० : आंध्र प्रदेशातील तेलंगणा येथील पोचमपल्ली खेड्यातील ८० एकर जमीनीच्या भूदानाने विनोबा भावे यांची भूदान चळवळ सुरू झाली.
१९५४ : गामल अब्दल नासर याने इजिप्तची सत्ता ताब्यात घेतली.
१९७१ : एअर इंडियाचे पहिले बोईंग ७४७ जंबो जेट विमान 'सम्राट अशोक' शाही दिमाखात सकाळी ८-२० वाजता सांताक्रूझ विमानतळावर दाखल.
२००१ : भूसंलग्न उपग्रह प्रक्षेपक (- १) वाहकाचे रशियन बनावटीच्या क्रायोजेनिक इंजिनाच्या साहाय्याने श्रीहरिकोटा तळावरून यशस्वी प्रक्षेपण

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७४ : सवाई माधवराव पेशवा यांचा पुरंदर किल्ल्यावर जन्म (मृत्यू: २७ आक्टोबर १७९५)
१८५८ : महर्षी अण्णासाहेब तथा धोंडो केशव कर्वे स्त्रीशिक्षण व विधवा विवाह यातील कर्ते समाजसुधारक, पद्मभूषण, भारतरत्न (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९६२ मुरुड)
१९०१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी व प्रशासक चंदेश्वर नारायण प्रसाद सिंह यांचा जन्मदिन.
१९१० : विश्वनाथ नागेशकर, भारतीय,गोवेकर चित्रकार.
१९१६ : ललिता पवार अभिनेत्री (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९९८)
१९६२ : पूनम धिल्लन अभिनेत्री
१९५८ : माल्कम मार्शल वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९९९)
१९९१ : डॉ. वृषाली करी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५९ : क्रांतीवीर तात्या टोपे (रामचंद्र पांडुरंग टोपे).
१९४५ : व्हॅक्यूम ट्यूब चे शोधक जॉन एम्ब्रोस फ्लेमिंग यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १८४९)
१९५५ : अल्बर्ट आइनस्टाइन, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१९५९ : लोकप्रिय भारतीय क्रांतीकारक व पत्रकार बरिंद्र कुमार घोष यांचे निधन.
१९६६ : योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद यांचे निधन. (जन्म: ३० ऑगस्ट १८८३ डभई, गुजराथ)
१९९५ : पंचांगकर्ते आणि ज्योतिषशास्त्राचे व्यासंगी अभ्यासक पंडित धुंडिराजशास्त्री ऊर्फ अण्णा लक्ष्मण दाते यांचे निधन.
१९९९ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार रघुवीर सिंह यांचे निधन. (जन्म: २२ ऑक्टोबर १९४२ जयपूर)
२००१ : प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि भूगोल आदी विषयातील पार्श्वभूमी असलेले नार्वेशियान लेखक थोर हेयरडाल यांचे निधन.
२००२ : नॉर्वेजियन दर्यावर्दी संशोधक थोर हेअरडल, मानववंशशास्त्रज्ञ यांचे निधन. (जन्म: ६ ऑक्टोबर १९१४)
२००२ : महाराष्ट्र विधान सभेचे अध्यक्ष शरद दिघे यांचे निधन.
२००३ : भारतीय 'हिंदी साहित्यिक व साहित्यकार' सुधाकर पाण्डेय यांचे निधन.

## बहूपयोगी सेंद्रिय कीटकनाशक दशपर्णी अर्क, तयार करण्याची पद्धती आणि वापर

खरीप पिकांची पेरणी/ लागवड केल्यानंतर सुरुवातीच्या काळात पिकांवर रसशोषक किडी आणि काही अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. यावेळी सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून या किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून हे शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.

दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर : कडुनिंब पाला ५ किलो. एरंडपाला २ किलो. गुळवेलपाला २ किलो. घाणेरीपाला २ किलो. पपईचा पाला २ किलो. सिताफळाचा पाला २ किलो. रूईचा पाला २ किलो. पांढरा धोतरा २ किलो. करंजपाला २ किलो. लाल कन्हेरपाला २ किलो. झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य : प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले वापरू नये. गोमूत्र जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.

दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत : यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे. वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसूण ठेचा, देशी गायीचे शेण व गोमूत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकून ठेवून असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे. दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा. दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.

दशपर्णी अर्काचा वापर : दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्याच्या आत वापरता येते. मात्र अर्क बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवलेला असावा. दशपर्णी हा तयार झालेला अर्क कीड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्यात २०० मिली दशपर्णी अर्क फवारणीसाठी वापर करावा. फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी.

दशपर्णी अर्काचे फायदे : दशपर्णी अर्काच्या फवारणीमुळे मित्र किडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होते. उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात. रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहत नाहीत. अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते. पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेती मालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळतो.



# राष्ट्रीय हस्ताक्षर स्पर्धेत पार्थ अकॅडमीने मिळविले प्रथम विजेतेपद

## राष्ट्रीय हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांचे मान्यवरांकडून गुणगौरव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

'राष्ट्रीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धा' या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सलग पाचव्यांदा राज्यात प्रथम येण्याचा बहुमान अंबाजोगाईच्या पार्थ अकॅडमीने पटकावला आहे. अकॅडमीचे सिध्दांत संदीप कापसे व अनन्या संदीप चव्हाण हे विद्यार्थी राष्ट्रीय हस्ताक्षर स्पर्धेत राज्यात सर्वप्रथम आले आहेत. तर ९ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकावले आहे. यापूर्वी अकॅडमीचे ६ विद्यार्थी हे राष्ट्रीय हस्ताक्षर स्पर्धेत राज्यात सर्वप्रथम आले होते. कॅलिग्राफर विनोद आडे यांच्या पुढाकारातून असंख्य विद्यार्थ्यांच्या अक्षरात अमुलाग्र बदल व परिवर्तन झाले आहे. अकॅडमीच्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन नुकतेच अंबाजोगाई येथे करण्यात आले होते.

शहरातील स्व.विलासराव देशमुख सांस्कृतिक सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले हे होते, प्रमुख अतिथी म्हणून अक्षय मुंदडा (युवा नेते भाजपा), सुप्रसिद्ध हृदय रोग तज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, मुख्याध्यापिका गितांजली कुलकर्णी, रामराव आडे, कॅलिग्राफर विनोद आडे यांच्या हस्ते अकॅडमीच्या गुणवंतांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी बोलताना अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, स्पर्धेचे युग आहे. स्पर्धेत टिकून राहणे हे मोठे आव्हान आहे. असे सांगून मातृभाषेसोबतच इतरही भाषा




आत्मसात करा. मनात ध्येय ठेवा. सुंदर हस्ताक्षर क्षेत्रात करीअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. पार्थ अकॅडमीची कामगिरी ही अंबाजोगाईकरांसाठी अभिमानाची बाब असल्याचे मत मुंदडा यांनी व्यक्त केले. तर यावेळी अक्षर सुंदर करण्याचे संस्कार पार्थ अकॅडमी निरंतर करते असे मुख्याध्यापिका गितांजली कुलकर्णी यांनी सांगितले. तर विनोद आडे हे मेहनतीने पुढे आलेले ध्येयवेडे व्यक्तिमत्व आहे. त्यांची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी आयुष्यात यश संपादन करावे असे डॉ.नवनाथ घुगे यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.राजेश इंगोले म्हणाले की, आडे भावंड हे गुणवंत आहेत. पार्थ अकॅडमीच्या माध्यमातून विनोद आडे यांनी अंबाजोगाईत अक्षराचा संस्कार रूजविला. नाव उंचावून ते अंबाजोगाईच्या इतिहासाला ते एक नवा आयाम देत आहेत. सुंदर अक्षर हा अनमोल अलंकार आहे. आज मोबाईलमुळे मुलांमध्ये विविध मानसिक आजार वाढत आहेत. त्यामुळे पालकांनी मुलांना मोबाईल पासून दूर ठेवा. मुलांना वेळ द्यावा. मुलांशी संवाद साधावा असे आवाहन डॉ.इंगोले यांनी केले. प्रास्ताविक करताना पार्थ अकॅडमीचे संचालक विनोद आडे यांनी सांगितले की, मागील ९ वर्षांपूर्वी या स्पर्धेत मुंबईचेच विद्यार्थी सर्वप्रथम यायचे मात्र मुंबई व पुणे यांची मक्तेदारी खंडीत करण्याचे काम अंबाजोगाईच्या पार्थ अकॅडमीने करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या स्पर्धेत दरवर्षी संपुर्ण देशातून तब्बल ७ ते ८ लाख विद्यार्थी सहभागी होतात. आपले विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरांवर उत्तुंग यश मिळवत आहेत. पार्थ अकॅडमीच्या माध्यमातून मागील दहा वर्षांत बीड, लातूर, परभणी, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, सातारा, नाशिक आणि कोल्हापूर येथील ३१०० पेक्षा ही अधिक विद्यार्थी प्रशिक्षित केले आहेत. तर पुढील काळात ऑनलाईन माध्यमातून राज्यातील १० हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणार असल्याचे विनोद आडे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरूवातीस दीपप्रज्ज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार डॉ.वैभव काळे यांनी मानले.

या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय व राज्य हस्ताक्षर स्पर्धेतील विजेते : १) सिद्धांत संदिप कापसे (वर्ग २ री, ग्रुप ए - १ ली ते ४ थी, संपुर्ण राज्यातून सर्वप्रथम), पुरस्काराचे स्वरूप : सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, 'ओशन रिव्हिलींग द सिक्रेट्स ऑफ द डिप', हा ग्रंथ तसेच पुष्पगुच्छ, २) अनन्या संदिप चव्हाण (ग्रुप बी - ५ वी ते ८ वी संपुर्ण राज्यातून सर्वप्रथम), पुरस्काराचे स्वरूप : (सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, 'द एनसायक्लोपिडीया ऑफ ॲनीमल्स अ कम्प्लीट विज्युअल गाईड' हा ग्रंथ तसेच पुष्पगुच्छ. राष्ट्रीय हस्ताक्षर स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते - ग्रुप - ए (१ ली ते ४ थी) - १) अर्णव भगीरथ कराड (प्रथम क्रमांक), २) तेजल अच्युत मुंडे - (द्वितीय क्रमांक) आणि ३) शरयु गोविंद मैड - (तृतीय क्रमांक) प्राप्त केला. ग्रुप - बी (५ वी ते ८ वी) - १) गौरी रमेश कांबळे - (प्रथम क्रमांक), २) फैजल अझरूद्दीन शेख - (द्वितीय क्रमांक) आणि ३) आरूषी दत्तप्रसाद बाहेती - (तृतीय क्रमांक), तसेच सुवर्णपदक विजेते : ग्रुप - सी (९ वी ते १२ वी) १) दिशा जितेंद्रकुमार हरदास - (प्रथम क्रमांक), २) प्रथम दत्तप्रसाद बाहेती - (द्वितीय क्रमांक) आणि ३) ज्ञानदा सुनिल वनवे - (तृतीय क्रमांक) प्राप्त केला. या सर्व विजेत्यांना सुवर्णपदक, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देण्यात आले. तर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या सोबतच पार्थ अकॅडमीला बेस्ट परफॉर्मन्स स्कुल अवॉर्ड प्राप्त झाले. सतत ५ वर्षे राष्ट्रीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत राज्यात सर्वप्रथम क्रमांक मिळविण्याचा बहुमान प्राप्त केल्याबद्दल पार्थ अकॅडमीचे संचालक विनोद आडे यांचा ही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अमोल खोकले, ओम पिंपळे,प्रकाश मुंडे, महेश अंबाड, गितांजली धायगुडे व अश्विनी विनोद आडे यांनी पुढाकार घेतला. गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभास विविध क्षेत्रातील मान्यवर, गुणवंत विद्यार्थी, पालक तसेच अकॅडमीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



### नारायणगड, भगवानगडाच्या नारळी सप्ताहास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांची उपस्थिती

बीड। प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील राक्षसभुवन (तांबा) येथील श्री क्षेत्र नारायणगडाच्या ७३ व्या आणि पिंपळनेर येथील श्री क्षेत्र भगवानगडाच्या ९१ व्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहात कल्पतरुच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी भेट दिली. संत परंपरेचा वारसा आणि आध्यात्मिक ऊर्जेचं शक्तीस्थान असलेल्या या दोन्ही गडांना भेट देऊन त्यांनी सप्ताहात सहभाग घेतला. याप्रसंगी त्यांनी भगवान गडाचे महंत ह.भ.प. नामदेव शास्त्री महाराज, भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री नारायणगडाचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज, नारायणगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. संभाजी महाराज या संत-महंतांचे आशीर्वाद घेतले. या भेटींमधून त्यांना अमूल्य आध्यात्मिक प्रेरणा व ऊर्जा लाभल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी अनेक सहकारी व भाविक भक्तांचीही उपस्थिती होती, ज्यामुळे वातावरण भक्तिभावाने भारलेले होते.

### नाथरा येथे श्री स्वामी समर्थ संदेश यात्रा व पालखी सोहळा

माजलगाव। प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने नाथरा येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने नाथरा येथे टाळ, मृदंग, भजनी मंडळ, दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा या नामघोषात तसेच फटाक्यांच्या आतिषबाजीत श्री स्वामी समर्थ महाराजांचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी नाथरा गावातील सर्व रस्त्यांवर सडा, रांगोळी काढून सुशोभीकरण करण्यात आले होते तसेच जागोजागी साड्यांच्या पायघड्या टाकून श्री स्वामी समर्थ महाराजांचे पूजन करण्यात आले . महिला आणि मुली कलश घेऊन या पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते. यानंतर श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त दि. २० ते २६ एप्रिल दरम्यान गावातील भाविक सेवेकरी श्री गुरुचरित्र या प्रासादिक ग्रंथाचे पारायण सेवेचे नियोजन करण्यात आले. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी सोहळ्याने संपूर्ण नाथरा गावात स्वामीमय वातावरण निर्माण झाले आहे. यानंतर प्रसाद वाटप करण्यात आला. या संदेश यात्रेत गावातील सर्व महिला पुरुष, अबाल वृध्द मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते जलव्यवस्थापन कृती पंधरवाडाचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

जलसंपदा विभाग जिल्हा बीड मार्फत जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ कार्यक्रमाचे दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे सकाळी ११:३० वाजता जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर यांच्या पुढाकाराने जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी श्रीमती कविता जाधव, जिल्हा कृषी अधिकारी सुभाष साळवे, तहसीलदार चंद्रकांत शेळके, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा मुकुंद आंधळे, अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या पल्लवी जगताप,यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व जलपूजन तसेच जल प्रतिज्ञा घेऊन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यकारी अभियंता नखाते यांनी केले. पाणी व्यवस्थापनाबाबत लेखाजोखा मांडला. शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जल व्यवस्थापनाबाबत विशेष मार्गदर्शनाचा उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. नंदकिशोर खामकर यांनी उपस्थितांना जल प्रतिज्ञा दिली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मनोगत व्यक्त करताना जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ च्या सर्व कार्यक्रमात जिल्हाधिकारी कार्यालय हे जल संपदा विभागासोबत राहिल अशी ग्वाही दिली. तसेच पाणी बचतीचे मोलाचे मार्गदर्शन केले. मुकुंद आंधळे, सुभाष साळवे, चंद्रकांत शेळके, सुभाष जाधव, पंजाब काकडे यांनी पाणी वापराबाबत आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती पल्लवी जगताप यांनी व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ मध्ये विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्याच्या सूचना जलसंपदा विभाग बीड अंतर्गत अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या तसेच जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ हा केवळ १५ दिवस न राबविता वर्षभर राबविण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग सुरेंद्र पवार बीड यांनी तर सूत्रसंचालन संतोष बनकर यांनी केले.

## तालुका अध्यक्षपदासाठी पांडुरंग नागरगोजे उत्कृष्ट

पाटोदा। प्रतिनिधी



गेल्या दोन दशकावून अधिकार सातत्याने भारतीय जनता पार्टीमध्ये पूर्ण वेळ कार्यरत राहून अत्यंत प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमपणे पक्ष वाढीसाठी कार्य करून ग्रामीण भागामध्ये जनसामान्यांच्या आणि अडचणी सोडवण्यासाठी एक कार्यक्षम कार्यकर्ता म्हणून काम करत असलेले पांडुरंग नागरगोजे यांची भाजपाच्या पाटोदा तालुका अध्यक्षपदी निवड व्हावी अशी अपेक्षा तालुका भर होताना दिसत आहे.

पांडुरंग नागरगोजे यांनी केंद्रीय राखीव पोलीस दलातून १९९७ ला आल्यानंतर सामाजिक कार्य जोमाने सुरू केले.१९९८ बूथ कार्यकर्ता, २००२ बूथ प्रमुख,ग्रामपंचायत सदस्य २००७ तालुका सरचिटणीस, ग्रामपंचायत सरपंच, २०१३ दुबार सरचिटणीस (सं), २०१६ सरचिटणीस कायम (सं) २०१७ लोकनियुक्त सरपंच २०१९ सरचिटणीस कायम (सं )२०२३ कृषी उत्पन्न बाजार समिती, सेवा सहकारी सोसायटी मतदार संघातून उप सभापती अशी विविध पदे त्यांनी भुषवली परंतु कुठलाही अहंभाव किंवा मोठेपणा बडेजाव न आणता अत्यंत साधेपणातून त्यांनी जनसामान्यांची कामे करण्याला प्राधान्य दिले. एकूणच, सद्यस्थितीत होऊ घातलेल्या पाटोदा तालुका भाजपा अध्यक्ष पदाच्या मुलाखती मधून एक कार्यक्षम अभ्यासू कार्यकर्ता म्हणून पाटोदा तालुका अध्यक्ष पदाची भाजप पक्षाची माळ पांडुरंग नागरगोजे यांच्या गळ्यात पडावी अशी अपेक्षा तालुक्यातून व्यक्त केली जात आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे सर्वसामान्यांच्या गळ्यातील ताईत होते. त्यांची लोकप्रियता कार्यक्षमता आणि राजकारणातील विद्यापीठ म्हणून त्यांची ख्याती देशभर होती. त्यांच्याच विचार कार्यावर विश्वास ठेवून त्यांचे विचार पुढे नेण्यासाठी सक्षम अभ्यासू अष्टपैलू कार्यकर्ता पांडुरंग नागरगोजे या रूपाने पाटोदा तालुका भाजप पक्षाला योग्य न्याय देऊ शकेल असा विश्वास कार्यकर्त्यामध्ये आहे.

## चिंचाळा येथील अंगणवाडीमध्ये पालक मेळावा

### मेळाव्याला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



वडवणी । प्रतिनिधी

चिंचाळा येथे मंगळवारी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प वडवणी यांच्यावतीने पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते .या पालक मेळाव्याला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या प्रकल्प वडवणी योजनेच्या सीडीपीओ मेत्रे मॅडम उपस्थित होत्या व परिवेक्षिका राऊत मॅडम, मस्के मॅडम व भंडारी मॅडम या ही उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंचळा गावच्या सरपंच नीता सुभाष आजबे होत्या.मीनाक्षी मुंडे याही उपस्थित होत्या या कार्यक्रमांमध्ये बालकांचा बौद्धिक मानसिक शारीरिक व सर्वांगीण विकास याबद्दल उपस्थित पालकांना मार्गदर्शन करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या वस्तूंचे रंगांचे, वेगवेगळ्या चवीचे, ज्ञान होण्यासाठी तसेच स्पर्श ज्ञान होण्यासाठी प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. या प्रदर्शनाचा लाभ पालकांनी घेतला सदरील कार्यक्रमासाठी कुप्पा विभागाच्या सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगणवाडी सेविका धिरे रसिका, शिरसट विद्या, गिरी महानंदा, ज्योती भारती जनाबाई शिरसाट, सुनिता काटे, सुनिता पायके यांनी परिश्रम घेतले.यावेळी पालकांना भोजनही देण्यात आले.

## अंबाजोगाईचे भूमिपुत्र डॉ. संदेश सुराणा यांची निवड

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील जेष्ठ पत्रकार स्वर्गीय लालचंद खुराणा व आदर्श शिक्षिका श्रीमती लिलाबाई सुराणा यांचे सुपुत्र सध्या पुणे येथे कार्यरत असणारे अंबाजोगाई शहराचे भूमिपुत्र डॉ. संदेश लालचंद सुराणा यांची द युरोलॉजी सोसायटी पुणे या संघटनेच्या सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. अंबाजोगाई शहर हे नवरत्नांची खान आहे. या शहराने देशास अनेक दिग्गज विभूती दिल्या आहेत. यातच डॉ संदेश सुराणा यांची भर पडल्याने अंबाजोगाई शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

द यूरोलॉजी सोसायटी पुणे ही मूत्रपिंड शल्य चिकित्सक यांची संघटना आहे. याद्वारे आरोग्य क्षेत्रात विविध उपक्रम राबविले जातात. नुकतीच या संघटनेची बैठक संपन्न होवून यामध्ये संघटनेच्या पुणे शहराच्या सचिवपदी डॉ. संदेश सुराणा यांची एकमताने बिनविरोध अशी निवड करण्यात आली. द यूरोलॉजी सोसायटी पुणे ही एक नामांकित ऑर्गनायझेशन आहे. पुणे शहरांमध्ये सर्व न्यूरोलॉजिस्ट म्हणजेच मूत्र विकार तज्ञ यांची ही



संघटना आहे.

डॉ. संदेश सुराणा हे अंबाजोगाई शहरातील प्रख्यात पत्रकार स्व. लालचंद सुराणा व आदर्श शिक्षिका लीलाबाई सुराणा यांचे सुपुत्र आहेत.

द युरोलॉजी सोसायटी ही संघटना १९९२ साली स्थापन झाली आहे. या संस्थेची तथा संघटनेची पुण्यासोबतच संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण घेत असलेल्या तसेच शिक्षण पूर्ण होऊन मुत्र विकार क्षेत्रातील कार्य करत असलेल्या डॉक्टरांच्या अडीअडचणी तसेच रुग्णांच्या अडचणी विषयी वेळोवेळी विचारविनिमय केले जातात. संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या बैठकीमध्ये आपल्या ज्ञानाची दिवाण-घेवाण केली जाते तसेच नवनवीन माहितीवर चर्चा केली जाते.

मागील १० वर्षापासून डॉ. संदेश सुराणा हे या संस्थेशी जोडले गेले आहेत. त्यांनी पहिल्यांदा कौन्सिल मेंबर नंतर खजिनदार म्हणून देखील या संस्थेत आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पडली आहे. संघटनेत त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांची संघटनेचे सचिव या पदासाठी सर्वानुमते व बिनविरोध अशी निवड करण्यात आली आहे. डॉ. संदेश सुराणा हे पुण्यामध्ये रुग्णसेवेच्या माध्यमातून आपले कर्तव्य बजावत आहेत. त्यांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगवेगळे वर्कशॉप घेऊन अनेक रुग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया केल्या आहेत . आपले कौशल्य, ज्ञान आणि बुद्धिमत्तेचा वापर करून ते आज पुण्यासारख्या महानगरात यशस्वी डॉक्टर तथा एक यशस्वी न्यूरॉलॉजिस्ट म्हणून सुपरिचित झाले आहेत. ते पुना हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर तसेच संजीवन हॉस्पिटल च्या माध्यमातून रुग्णसेवा करत आहेत.

# उष्मघातापासून बचाव, लक्षणे आणि उपाययोजना

बीड। प्रतिनिधी

येणाऱ्या काही दिवसामध्ये आपल्या भागात उष्णतेची लाट जाणवू शकते, उष्मघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा उष्माघाताची लक्षणे आढळून झाल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावा.या उष्णतेच्या काळात उष्माघात होऊ नये. यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे गरजेचे आहे.उष्मघात उपचारासाठी शासकीय रुग्णालयांत सज्जता ठेवण्यात यावी अशा सूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिल्या आहेत.उष्मघात होण्याची कारणे साधारणत: पुढील आहेत.यात उन्हामध्ये शारिरीक श्रमाचे, मजूरीचे कामे फार वेळ करणे, कारखान्याचे बॉयलर रुममध्ये काम करणे,काच कारखान्यातील काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे, उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबध येणे. उष्मघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करुन घ्यावेत. यासाठी उष्माघात उपचारांसाठी शासकीय रुग्णालयात सज्जता ठेवण्यात यावी.

शरीरास घाम सुटणे, तहान लागणे, शरीर शुष्क होणे, ताप येणे (१०२) पेक्षा जास्त त्वचा कोरडी पडणे,भुक न लागणे,चक्कर येणे,निरुत्साही होणे,डोके दुखणे,रक्तदाब वाढणे,मानसिक बेचैन, अस्वस्थ, बेशुध्द अवस्था उलटी इत्यादी होणे.जोखमीचे गट वय ५ वर्षापेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त, कष्टाची सवय नसणारे लोक, धुम्रपान, मद्यपान करणारे आणि कॉफी पिणारे व्यक्ती, मुत्रपिंड,- हृदयरोग,यकृत, त्वचा विकार लठ्ठपणा, मधूमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण. या औषधाचे सेवन सुरु असलेले रुग्ण, जास्त् ? तापमान, अति आद्रता, वातानुकुलनाचा अभाव, तंग कपडे, शेत काम, कारखान्यातील काम ऊन आणि उष्णतेशी संबधीत व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती.

वाढत्या तापमानाच्या वेळेत कष्टाची कामे टाळणे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असताना करावी, उष्णता शोषुन घेणारे कपडे उदा. काळया किंवा भडक रंगाचे कपडे वापरु नयेत. सैल व उष्णता परावर्तित करणारे पांढ-या रंगाचे कपडे वापरावेत. जल संजीवनीचा वापर करावा, पाणी भरपूर प्यावे. सरबत प्यावे, उन्हामध्ये काम टाळावे व सावलीत विश्रांती घ्यावी. शक्यतो उन्हात फिरण्याचे टाळावे. आवश्यकता असल्यास उन्हात जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे. किंवा लिंबू शरबत प्यावे. उन्हात जाण्या आगोदर जेवन करावे, रिकाम्या पोटी उन्हात जाऊ नये. कान व डोक्याचा उन्हापासून बचाव करणे आवश्यक आहे. डोक्याभोवती पांढरा रुमाल गुंडाळावा. गॉगल्स व हेलमेट वापरावी. वृध्दांना व बालकांना उन्हात फिरु देऊ नये. रुग्णास हवेशीर खोलीत ठेवावे, खोलीत पंखे, कुलर ठेवावीत शक्यतो वातानकुलीत खोलीत ठेवावेत. रुग्णाच्या शरिराचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णाला बर्फाच्या पाण्याने अंघोळ घालावी. रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्टया ठेवाव्या. आईसपॅक लावावेत, ओआरएस सोल्युशन द्यावे. उन्हाळयामुळे उष्माघाताचे रुग्णावर उपाययोजना करण्यासाठी व मृत्यू टाळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांनी आवश्यक ती सर्व तयारी ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे. उदा. हवेशीर खोली, पुरेशी औषधी, सलाईनचा साठा, खोलीत पंखे, कुलर इत्यादी सुस्थितीत ठेवावी. बर्फाच्या उपलब्धतेसाठी फ्रिज सुस्थितीत असणे आवश्यक आहे. उष्मघाताची कारणे लक्षणे प्राथमिक उपचार त्याचप्रमाणे उष्मघात होऊ नये म्हणून घ्यवयाची काळजी याची माहिती आरोग्य शिक्षणाव्दारे प्रचार माध्यमातुन द्यावी.काय करावे: तहान नसली तरी भरपूर पाणी,सरबत प्यावे, हवा खेळती राहण्यासाठी पंख्याचा वापर करावा, सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावेत, सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी, फेटा चष्मा वापरणे, मजूर वर्गास वारंवार विश्रांती घेवु द्यावी, उन्हातुन आल्यावर चेह-यावर ओले कापड ठेवावे,काय करावे:- तहान नसली तरी भरपूर पाणी सरबत प्यावे हवा खेळती राहध्यासाठी पख्यांचा वापर करावा. सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावेत. सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी,फेटा, चष्मा वापरणे, मजूर वर्गास वारंवार विश्रांती घेऊ द्यावी. उन्हातुन आल्यानंतर चेह-यावर ओला कपडा ठेवावा. काय टाळावे:-मद्य, सोडा, कॉफी, अती गार पाणी आदी पिणे टाळावे, गरज नसतांना उन्हात फिरणे, तंग व गडद कपडे वापरणे, सवय आहे. म्हणून उन्हात निघणे, अति व्यायाम करणे, बंद कारमध्ये राहणे, अति शारिरीक कष्टाचे कामे करणे. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२. ०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळया हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी. अगदी साध्या व सोप्या उपाययोजनांव्दारे आपण उष्माघातापासून आपले संरक्षण करु शकतो असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यांनी केले आहे. अगदी साध्या आणि सोप्या उपाययोजनाव्दारे आपण उष्मघातापासून आपले संरक्षण करु शकतो.चला तर मग प्रशासनाच्या या आवाहनानुसार काळजी घेऊया. उष्मघातापासून आपले आपण संरक्षण करुया.

cmyk

राज्य **लोकतंत्र**

शुक्रवार, दि.१८ एप्रिल २०२५



# राक्षसभुवन येथील सप्ताह सांगतेला भाविकांचा जनसागर उसळला

## महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

**शिरूर : शंकर भालेकर**

धाकटी पंढरी श्रीक्षेत्र नारायण गडाचा ७३ वा नारळी सप्ताह रक्षसभुवन (तांबा) ता. शिरूर येथे महंत शिवाजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गेल्या आठ दिवसापासून वैभवशाली थाटात पार पडत होता त्याची सांगता आज महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. या सांगतेच्या कार्यक्रमाला मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, आ. सुरेश धस, माजी आ.बाळासाहेब आजबे आदीसह मोठ्या संख्येने राजकीय मान्यवर उपस्थित असल्याने या सांगतेच्या सोहळ्याला धार्मिक राजवैभव प्राप्त झाले होते.

महाराष्ट्रातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान तथा धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गडचा केवळ वारकरी सांप्रदायाचा नव्हे तर अध्यात्माच्या पटलावर मोठा नावलौकिक आहे. श्री क्षेत्र नारायणगडपीठ सर्वत्र गुरुस्थानी मानले जात आहे. यामुळे श्री.क्षेत्र नारायण गड च्या कुठल्याही कार्यक्रमाला मोठा भाविक भक्तांचा ओघ असतो. शिरूर कासार तालुक्यातील राक्षस भवन( तांबा )येथे चालू असलेल्या नारळी सप्ताह आला तर गेली आठ दिवस भाविकांची मांदियाळीच पाहायला मिळाली होती परंतु आज या सप्ताहाची सांगता असल्याने संत-महंत, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांसह भाविक भक्तांचा महापूर आला होता. गेल्या आठ दिवसापासून चालू असलेल्या या वैभवशाली सोहळ्याची सांगता आज महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. सांगतेच्या कार्यक्रमाला अगदी सकाळपासूनच या ठिकाणी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील उपस्थित राहिल्याने हजारोच्या संख्येने त्यांच्या समर्थकांची उपस्थिती लाभली होती. आलेल्या भाविक भक्तांच्या सुख सोयीसाठी ग्रामस्थांच्या वतीने उत्कृष्ट असे नियोजन राबवले जात होते. महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने अखेर सप्ताहाची सांगता झाली या सप्ताहाच्या सांगतेच्या कार्यक्रमाला गडाचे उत्तराधिकारी संभाजी महाराज, भानुदास महाराज शास्त्री,महंत श्रीरंग महाराज तळेकर, महंत, गायक आदिनाथ महाराज सटले, रामेश्वर महाराज सुपेकर, हरी महाराज गवते, राजाभाऊ महाराज गवते, लक्ष्मण महाराज तकीक, शिवाजी महाराज मिसाळ, सिद्धेश्वर महाराज बागलाणे,शरद महाराज डोळस,कुमार महाराज ठोसर,मृदंगचार्य भरत महाराज पठाडे, गोरक्ष महाराज कोकाटे आधी नामावंत कलाकारांसह आष्टी -पाटोदा- शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आ. सुरेश धस, द्विंगत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख,माजी आ.बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादीचे(शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, शिवसंग्राम अध्यक्षा ज्योतीताई मेटे, खा.बजरंग सोनवणे यांचे चिरंजीव सौरभ सोनवणे,राजेंद्र मस्के, कुंडलिक खांडे,महेश दाभाडे,नितीन धांडे,चंद्रकांत नवले, ॲड. चंपावतीताई पानसंबळ इंजि.दिगंबर मळेकर राजकीय मान्यवरांसह श्री क्षेत्र नारायण गडाचे विश्वस्त सचिव ॲड. महादेव तुपे, सदस्य जे.पी.शेळके, दिलीप गोरे, बळीराम गवते, बी.बी.जाधव पत्रकार संदीप लवांडे, आदी राजकीय मान्यवरही या ठिकाणी उपस्थित राहिल्याने धार्मिक कार्याला एका प्रकारचे राजवैभव प्राप्त झाल्याचा अनुभव पाहायला मिळत होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिवव्याख्याते ज्ञानदेव काशीद यांनी केल्यामुळे कार्यक्रमाला बहर आला होता. सांगतेच्या कार्यक्रमानंतर लाखोच्या संख्येने संख्येने भाविक भक्तांना गावकऱ्यांच्या वतीने बुंदी आणि चिवडा या महाप्रसादाची पंगती देण्यात आली. या प्रसादाच्या पंगतीसाठी भर उन्हातही भाविकांनी पंगती धरून मोठ्या श्रद्धेने महाप्रसाद घेतला होता.





### जरांगे पाटील यांना अस्वस्थ वाटल्याने भाविकांशी संवाद टाळला

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील राक्षसभुवन तांबा येथे अगदी सकाळपासूनच उपस्थित होते. भाविक भक्तांची लाखोच्या संख्येने उपस्थित होती. काल्याच्या कीर्तनाने सांगता झाल्यानंतर आलेल्या मान्यवरांना या ठिकाणी भाविकांशी संवाद साधण्याची संधी मिळणार होती. सुमारे दोन ते अडीच तास मनोज जरांगे पाटील हे कीर्तनामध्ये बसून राहिले. त्यांना अचानक अस्वस्थ वाटले आणि त्यांनी केवळ सत्कार घेऊनच या ठिकाणी भाविकांची संवाद साधने पुन्हा एकदा टाळले यामुळे जरांगे पाटलांच्या समर्थकांमध्ये निराशा पाहायला मिळाली.

### नारायणगडच्या आदेशाचे पालन आमचे कर्तव्य -आ. सुरेश धस

महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर विविध क्षेत्रातील आलेल्या मान्यवरांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी आष्टी पाटोदा शिरूरचे आ. सुरेश धस यांचाही महंत शिवाजी महाराज हस्ते सत्कार करण्यात आला. सन २०३६ मधील श्रीक्षेत्र नारायण गडाच्या नारळी सप्ताहाचे नारळ आ. सुरेश धस यांनी महाराजाकडून घेतले असून आम्ही श्री क्षेत्र नारायण गडाची भक्त आहोत. या ठिकाणी आम्हाला जो आदेश देतील त्याचे पालन करणे हे आमचे कर्तव्य आहे. महंत शिवाजी महाराजांनी आम्हाला वेळोवेळी आदेश देत जावा आम्ही त्याचे भक्त म्हणून पालन करत जाऊ अभिवचन यावेळी आमदार सुरेश धस यांनी भाविकासमोर संवाद साधताना दिले आहे.

### उमापूरकरांच्या रॅलीने भाविकांचे मन वेधले

श्री क्षेत्र नारायण गडाचा ७४ व्या नारळी सप्ताहाचे नारळ गेवराई तालुक्यातील उमापूरकरांना मिळाले आहे. याप्रमाणे पुढील वर्षीचा हा सप्ताह असाच वैभवशाली थाटामध्ये पार पडणार असल्याचे चित्र यावेळी उमापूरकरांच्या वतीने दाखवण्यात आले. सुमारे २१०० कलशधारी महिलांनी दोन किलोमीटर अंतरापासून दूतर्फी रांग करून नारळ घेऊन जाण्यासाठी रॅली आणली होती. सर्व महिलांनी अगदी भगवे कपडे परिधान करून या रॅली च्या माध्यमातून उपस्थित भाविकांचे मन वेधून घेतले. ढोल ताशे, डीजे, टाळ मृदंगाचा जयघोष असे विविध सहभागातून आलेली ही रॅली राक्षस भुवन मधील सप्ताहाचे आकर्षण ठरले आहे.



**बीड : जिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा शल्यचिकित्सकपदी डॉ.संजय राऊत यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या कक्षामध्ये प्राध्यापक मित्रमंडळीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. कुडके शिवमुर्ती, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, प्रा.संजय काळे, प्रा कल्याण घोडके, प्रा.राजू कागदे ,प्रा. पार्श्वनाथ सिद्धेश्वर, प्रा. भालचंद्र गाडेकर, प्रा. आत्माराम सानप, प्रा. दिलीप बनसोडे आदींनी त्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.**

## विजचोरीचा दंड न टाकण्यासाठी ५० हजाराची लाच घेताना उपकार्यकारी अभियंत्यासह तिघे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पात्रुड येथील विज वितरणाच्या उप कार्यकारी अभियंत्याससह लाईनमन व खाजगी इसम अशा तिनं जणांना विज चोरीचा दंड न टाकण्यासाठी दोन लाखांची लाच मागितली त्यातील ५० हजार रुपयांची लाच स्विकारणारा लाईनमन,उप कार्यकारी अभियंता यांच्या सांगण्यावरून लाच स्वीकारल्याचे कबूल केले.आसल्याचे सांगितले.या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात महावितरणचे उपकार्यकारी अभियंता विवेक जनार्धन मवाडे, वायरमन शेख जलील शेख अब्दुला,खाजगी इसम मोमीन मोहीब यांच्या विरोधात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रत्येक क्षेत्रात अधिकारी कर्मचारी सर्वसामान्य जनतेचे काम लाच घेतल्याशिवाय करत नसल्याचे दिसून येत असताना अनेक अधिकारी कर्मचारी लाचखोरीच्या जाळ्यात अडकले आहेत.तरीही लाच घेणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यावर प्रशासनाचा कसलाच धाक राहिला नसल्याने हे प्रकार सर्रास होत असल्याने. वैतागून जाणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तींना लाच लुचपत प्रतिबंधक खात्याकडे जाण्या शिवाय पर्याय नसल्याने अधिकारी व कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात अडकत आहेत.माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे तक्रारदाराचे चहापाण्याचे हॉटेल आहे. त्यांचे मीटर जळाल्यामुळे वायरमनच्या परवानगीने दुसरीकडून लाईट घेतली.ही बाब वायरमनने उपकार्यकारी अभियंता यांना सांगून दंडाची भीती दाखवून पैसे उकळण्याचा प्लॅन बनवला.त्याप्रमाणे हॉटेलची झडती घेऊन वीजचोरी पकडली व पावणे दोन लाख रुपये दंडाची भीती दाखवली. तडजोडीत ५० हजार रुपये स्विकारण्याचे मान्य केले.बीड एसीबीने सापळा रचला. उप कार्यकारी अभियंत्याच्या सांगण्यावरुन वायरमनने ही लाच खाजगी इसमाच्या स्वाधीन केली. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.ही कारवाई उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या उपस्थितीत सुरेश सांगळे,श्रीराम गिराम,भरत गारदे, खरसाडे,राठोड, हनुमान गोरे,गणेश म्हेत्रे,पुरी यांनी केली.

## पत्रकार महेश सदरे यांना मातृशोक



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सचिव पत्रकार महेश धोंडीराम सदरे यांच्या आई श्रीमती निलावती धोंडीराम सदरे यांचं (दि. १६ एप्रिल) सकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या ८३ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे सचिव पत्रकार महेश सदरे यांच्या मातोश्री श्रीमती निलावती धोंडीराम सदरे वय वर्षे ८५ यांचे बुधवारी सकाळी ७ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले . त्यांच्या पाशच्यात तीन मुले,पत्रकार महेश सदरे,हनुमंत सदरे व सुनील सदरे , सुना, दोन मुली, जावई ,नातु,पनतु असा मोठा परिवार आहे.त्यांच्या निधनाने सदरे कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. श्रीमती निलावती सदरे यांच्या पार्थिवावर बुधवार रोजी दुपारी ३ वाजता वडवणी येथील वैकुंठधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सदरे कुटुंबियांच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

## सायगाव तलाठी कार्यालय पाडल्याप्रकरणी चौकशी समिती काय कारवाई करणार याकडे जिल्ह्याचे लक्ष

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव येथील तलाठी कार्यालयाची ईमारत सरपंच कैलास छबु मरके यांनी पदाचा दुरुपयोग करून बेकायदेशीरपणे संपूर्ण ईमारत पाडून शासनाचे व जनतेचे रु ९ ते १० लाख रुपयाचे नुकसान केल्याबाबतची तक्रार महेंद्र कचरू मस्के, शेहबाज अली मजाज अली, आसेम अली माहपेज अली उस्मानी, रफिक कुरेशी, फैसल मिर्झा अशफाक खतीब, हिदायत सादेक अली यांनी केली होती या तक्रारीची गंभीर दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभाग, पंचायत समिती च्या अधिकाऱ्यांची चौकशी समिती बुधवार दिनांक १६ रोजी सायगाव येथे आली होती.

१९९० ला बांधलेली तलाठी कार्यालयाची इमारत ग्रामपंचायत मध्ये वेणार



या नावे नोंद आहे ही इमारत लोकनियुक्त सरपंच कैलास छबू मस्के यांनी कुठल्याच कार्यालयाची परवानगी न घेता ही इमारत पाडली अशी तक्रार आहे. या ठिकाणी अंगणवाडी क्र ४ ही नोव्हेंबर पर्यंत चालू होती अशी माहिती चौकशी समिती ला अंगणवाडी सेविकेने दिली आहे तसेच ग्रामसेवक

## ऑलिम्पिक वीर अविनाश साबळे यास राज्यस्तर शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

ऑलिम्पिक मधून बीडचे नाव जगाच्या पातळीवर नेणाऱ्या अविनाश साबळे याला शिवछत्रपती राजे क्रीडा पुरस्कार जाहीर झाला असून उद्या शुक्रवार दिनांक १८ एप्रिल रोजी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार त्याला दिला जाणार आहे. म्हाळुंगे - बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे सकाळी ११ वाजता हा पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे.

### आज पुणे येथे पुरस्कार वितरण सोहळा



रुपये ३ लाख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अविनाश साबळे सध्या भारतीय सैन्य दलात कार्यरत असून बंगलूरु येथील सदर्न साई सेंटर येथे प्रशिक्षण घेत आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रा.जे. पी. शेळके तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर आदींनी साबळे यांचे अभिनंदन केले आहे.

## पठाण साहेब-हसन साहेब यात्रेला पाटोद्यात उत्साहात सुरुवात

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात पठाण साहेब आणि हसन साहेब यांच्या पारंपरिक यात्रेला बुधवारी उत्साही सुरुवात झाली. या यात्रेची मिरवणूक बैलगाडीतून काढण्यात आली असून, विविध देखावे, सजावटी व पारंपरिक वेशभूषेने सजलेल्या मिरवणुकीने पाटोदेकरांचे लक्ष वेधून घेतले.या संदल मिरवणुकीची खासियत म्हणजे हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत ही यात्रा पार पाडली. यामधून सामंजस्य,ऐक्य आणि धार्मिक सौहार्दाचा एक सकारात्मक संदेश संपूर्ण तालुकाभर पोहोचला आहे.यात्रेच्या संदल मिरवणुकीत नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, सभापती ,तसेच नगरसेवक न्युयमभाई पठाण यांनीही सहभाग घेत.ढोल-ताशांच्या गजरात लेझीम नृत्य केले या यात्रेमुळे पाटोदा शहरात धार्मिकतेसोबतच सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. यात्रेचे आयोजन पाटोदा नगरपंचायतने एकदम शिस्तबद्ध व प्रभावी केल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



**संदलची बैलगाडीतून मिरवणूक, विविध देखाव्यातून हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश**

## महाराणी ताराबाईंच्या विद्यार्थ्यांना ८ लाख ४० हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार - संजय आंधळे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे १४ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील इयत्ता-८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या एनएमएमएस २०२४-२५ शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून पात्र झाले आहेत त्यांचा पालकासह विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष मा.श्री.संजयभाऊ आंधळे यांच्या शुभहस्ते गुणगौरव करण्यासाठी सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून सोमवार दि.१४ एप्रिल २०२५ रोजी विद्यालयांमध्ये संपन्न



### शालेय समितीचे अध्यक्ष संजय आंधळे यांच्या शुभहस्ते एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या १४ विद्यार्थ्यांचा सत्कार

झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते मा.संजयभाऊ आंधळे तसेच विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी., उपप्राचार्य मस्के ए.आर.,पर्यवेक्षक धाईतिडक सर,अर्थ विभाग प्रमुख श्री.डोईफोडे सर,प्रमुख वक्त्या म्हणून श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम,श्री.कुलकर्णी सर अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. एनएमएमएस शिष्यवृत्तीस पात्र झालेल्या कु.रेडेकर प्रांजल,कु.बोंगार्डे वेदिका,कु. दिवटे संस्कृती,चि.बारटक्के सुमित,चि.गुरसाळी गौरव,चि. मुंडे गोरख,चि.रोकडे कुणाल,चि.घुमरे श्रीराज,कु.झाडे श्रावणी,कु. वरवडे जान्हवी,

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# स्वारगेट प्रकरणात ५२ दिवसानंतर ८९३ पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात खळबळ उडवून देणाऱ्या स्वारगेट बलात्कार प्रकरणात गुन्हे शाखेकडून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे दोषारोपपत्र ८९३ पानांचे आहे. या प्रकरणात पोलिसांच्या ताब्यात असलेला आरोपी दत्तात्रय गाडे याच्या विरुद्ध शिवाजनगर येथील सत्र न्यायालयात हे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.



गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने ५२ दिवसात हा तपास पूर्ण केला आहे. या प्रकरणात एकूण ८२ साक्षीदार तपासले. त्यातील पाच साक्षीदारांचे कोर्टासमोर जबाब नोंदविण्यात आले आहेत. तसेत १२ पंचनामे करण्यात आले आहेत. गुगल सर्च हिस्ट्री पंचनामा, ध्वनीचा तुलनात्मक तीव्रता पंचनामा करण्यात आला आहे. या घटनेदरम्यान तरुणी ओरडली का नाही असा सवाल उपस्थित करण्यात आला होता. मात्र ती मोठ्याने ओरडली होती. परतूं गाडीच्या काचामुळे तिचा आवाज बाहेर आला नसल्याचे पुढे आले आहे. गाडे हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्या विरुद्ध सात गुन्हे दाखल आहेत.

स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात २५ फेब्रुवारी रोजी सकाळी सहाच्या सुमारास परगावी निघालेल्या एका प्रवासी तरुणीकडे आरोपी गाडेने वाहक असल्याची बतावणी केली. त्यानंतर तरुणीला एका शिवशाही बसमध्ये नेले. दरवाजा लावून त्याने तरुणीला जिवे मारण्याची धमकी देऊन दोनदा बलात्कार केला. या घटनेचे राज्यात पडसाद उमटले होते.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला तात्पुरता दिलासा? डॉ. घैसास यांच्यावरही ठपका नाही, ससूनचा ६ पानांचा अहवाल सादर

**पुणे । प्रतिनिधी**

गर्भवती महिला मृत्यू प्रकरणी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला तात्पुरता दिलासा मिळाला असल्याची माहिती आहे. ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय समितीचा ६ पानांचा अहवाल पुणे पोलिसांना सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय समितीने अहवालात मंगेशकर रुग्णालय आणि डॉ. घैसास यांच्यावर ठपका ठेवला नसल्याची माहिती आहे. पुणे पोलिसांनी अहवालातील चार मुद्द्यांवर पुन्हा एकदा ससूनकडून अभिप्राय मागितल्याची माहिती आहे.

पुण्यातील तनिषा भिसे मृत्यूप्रकरणी ससूनचा बहुप्रतिक्षित अहवाल वैद्यकीय शिक्षण सचिवांना सादर करण्यात आला आहे. अहवालाची प्रत पुणे पोलिसांनाही पोस्टाने पाठवली आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये वैद्यकीय हलगर्जीपणा झाला का याचा ससूनच्या सहा डॉक्टरांकडून तपास करण्यात आला. या आधी तीन समित्यांचे अहवाल आधीच सादर करण्यात आले असून त्यापैकी दोन अहवालात




रूग्णालयावर ठपका ठेवण्यात आला आहे.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात डिपॉझिटअभावी गरोदर महिलेला उपचार नाकारण्यात आले होते. त्यामुळे या महिलेचा मृत्यू झाला होता. यानंतर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाविरोधात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर या प्रकरणाचा तपास करण्यासाठी ससूनच्या डॉक्टरांची एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने रुग्णालयाला तात्पुरता दिलासा दिला असल्याची माहिती आहे.

गेल्या महिन्यात, २८ मार्चला दीनानाथ रुग्णालय व्यवस्थापनानं भिसे कुटुंबाकडून १० लाखांची मागणी केली. त्याशिवाय उपचार करणार नाही असं सांगितलं. त्यानंतर तनिषा यांना दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आलं. आधीच नाजूक अवस्थेत असलेल्या तनिषा यांचा ३१ मार्चला दोन मुलींना जन्म दिल्यानंतर मृत्यू झाला. जन्माला आलेली ती दोन मुलं आईला पोरकी झाली आणि आता भिसे कुटुंबही या सगळ्या प्रकरणात होरपळतंय.

पुण्यातील प्रकरणात मेडिकल असोसिएशनने डॉ. घैसास यांना क्लिन चिट दिली आहे. या प्रकरणात डॉ. घैसास यांची चूक नसून त्यांना दोषी ठरवणं चुकीचं आहे. संबंधित गर्भवती महिलेला आतापर्यंत योग्य ट्रीटमेंट दिली होती. शिवाय ट्रीटमेंट देत असताना काही सूचना वेळोवेळी केल्या होत्या. ॲडमिट करून घेत असताना लागणारा खर्च महिलेच्या कुटुंबासमोर ठेवला. त्यामुळे घैसास यांची कुठे या प्रकरणात चूक नसताना त्यांनी आपलं काम योग्य पद्धतीने केलं असं इंडियन मेडिकल असोसिएशनने म्हटलं.

डॉ. घैसास यांना पोलिस संरक्षण

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील गर्भवती तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी, डॉ. सुश्रूत घैसास यांना पुणे पोलिसांनी संरक्षण देण्यात आलं आहे. डॉ. घैसास यांच्या सुरक्षेसाठी पुणे पोलिसांचा एक कर्मचारी तैनात असणार आहे. डॉ. घैसास यांना येत असलेले धमकीचे फोन आणि त्यांनी पुण्याबाहेर जाऊ नये यासाठी खबरदारी म्हणून पोलिसांकडून हे संरक्षण पुरवण्यात आल्याची माहिती आहे.

# नातेवाईकांना मेसेज करून , धनकवडीच्या तरुणाने संपवले जीवन


वेल्हे : तोरणागडाच्या पायथ्याच्या गुंजवणी धरणात कानंद (ता. राजगड)जवळ गुंजवणी धरणात उडी मारून पुण्यातील महाविद्यालयीन तरुणाने आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी तरुणाने नातेवाइकांना मोबाईलवर मेसेज पाठवला होता. करण शंकर दीक्षित (वय २४, रा. धनकवडी, पुणे) असे धरणात उडी घेणार्या तरुणाचे नाव आहे.



हा प्रकार बुधवारी (दि. १६) सकाळी ८ च्या सुमारास घडला. दुपारी चारच्या सुमारास वेल्हे पोलिसांनी हवेली तालुका आपत्ती व्यवस्थापन समितीच्या रेस्क्यू पथकाच्या मदतीने करण याचा मृतदेह धरणातील खोल पाण्यातून बाहेर काढला. मयत करण दीक्षित हा पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयात शेवटच्या वर्षात शिकत होता. मंगळवारी (दि. १५) तो घरातून दुचाकीने या परिसरात आला. त्याने घरातील नातेवाइकांना मी आत्महत्या करत आहे, असा मोबाईलवर मेसेज पाठवला होता. त्यामुळे नातेवाईक त्याचा शोध घेत होते. याबाबत नातेवाइकांनी बिबवेवाडी पोलिस ठाण्यात करण बेपत्ता असल्याची फिर्याद दाखल केली होती. दरम्यान, बुधवारी सकाळी ११ च्या सुमारास वेल्हे पोलिसांना एका तरुणाने धरणात उडी मारली असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर वेल्हे पोलिस ठाण्याचे हवालदार प्रसाद मांडके व हवालदार युवराज सूर्यवंशी यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर हवेली तालुका आपत्ती व्यवस्थापन समितीचे रेक्सु पथक घटनास्थळी दाखल झाले. रेस्क्यू पथकाचे प्रमुख तानाजी भोसले, गणेश सपकाळ, संजय चोरघे, संदीप सोलस्कर, नीलेश जाधव तसेच कानंदचे पोलिस पाटील संजय कडू यांनी धरणात उतरून शोध कार्य सुरू केले. तीन ते साडेतीन तासांनंतर दुपारी चारच्या खोल पाण्यातून करण याचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. नंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह वेल्हे येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आला. मयत करण दीक्षित याचे कपडे, मोबाईल फोन, दुचाकी गाडीची चावी, चप्पल त्याचा मृतदेह आढळला तेथील धरणाच्या तीरावर सापडले. मोबाईल फोनमध्ये करण याने शेवटचा फोन बुधवारी सकाळी ७.५० वाजता केला असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. त्यामुळे त्याने यानंतर कपडे, मोबाईल काढून तीरावर ठेवून धरणात उडी मारली असावी, असे पोलिसांनी सांगितले. याबाबत वेल्हेचे सहायक पोलिस निरीक्षक नितीन खामगंळ यांनी सांगितल की, करण याने धरणात उडी मारून आत्महत्या केली असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी सखोल तपास सुरू आहे.

# आजारी आईला भेटण्यासाठी निघालेल्या तीन लाडक्या बहिणींवर ओढवला बिकट प्रसंग

मंचर – आजारी असलेल्या आईला भेटण्यासाठी पुण्याहून नाशिकला जाणाऱ्या एसटी गाडीमध्ये तीन लाडक्या बहिणी बसल्या. पण कळंब (ता. आंबेगाव) गावात एसटीचा थांबा नाही. नारायणगावपर्यंत तिकीट काढल्यास कळंबला तुम्हाला सोडतो असे आश्वासन वाहकाने दिल्यामुळे त्यांनी नारायणगावचे तिकिटे काढले.



पण बुधवारी (ता. १६) रात्री नऊच्या सुमारास या महिला प्रवाशांना पुणे–नाशिक राष्ट्रीय महामार्गावर बिबट प्रवण क्षेत्र असलेल्या झाडी जुडवाजवळ एकलहरे येथे रस्त्यावर सोडून एसटी गाडी पुढे निघून गेली.

सदर वाहक चालकाच्या बेपारवाईमुळे जीव मुठीत धरून घाबरलेल्या अवस्थेत महिला रस्त्याच्या कडेला उभ्या होत्या. दीड किलोमीटरचे अंतर अंधारात कसे पार करायचे. ह्या चिंतेत असतानाच आलेल्या दोन पत्रकारांनी या लाडक्या बहिणींना सुखरूप घरी सोडले.बहिणींवर ओढवलेला प्रसंग प्रसार माध्यमात व्हायरल झाला असून, वाहक चालकांच्या कार्यपद्धतीचा या भागातील गावकऱ्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे. पुणे ते नाशिक एसटी गाडीत (एम एच ०९, एफ. एल८२२१) मोशी येथे स्नेहा काशीद (वय–३९), विद्या वारीक (वय–४४) रूपा भोर (वय–१५) तिघी बसल्या. त्यांनी मंचरपर्यंत सुरुवातीला तिकीट काढले. पण मंचर येथून कळंबला जाण्याची सोय नसल्याचे पाहून वाहकाला विनंती केली.'

जर तुम्ही नारायणगावचे तिकीट काढले तर कळंबला सोडतो, असे सांगितल्यामुळे त्यांनी कळंब गावाच्याच्या पुढे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या नारायणगाव पर्यंतच्या तिकिटाचे पैसे देऊन तिकीट घेतले. त्यांना वाटले रात्रीची वेळ असल्याने वाहक कळंबगावातून एसटी गाडी घेईल.पण तसे न करता एकलहरेच्या मुख्य चौकातही न सोडता त्यांना थेट घोड नदीजवळ पुलाशेजारी नेहमी बिबट्याचा वावर असलेल्या व झाडी झुडपी असलेल्या ठिकाणी सोडले. सर्वत्र अंधार झाडाझुडपातून कसे जायचे या चिंतेत महिलाहोत्या. योगायोगाने तेथून पत्रकार आयुब शेख व पत्रकार अमोल जाधव जात होते. त्यांनी धीर दिला.महिलांवर ओढवलेला प्रसंग प्रसारमाध्यमावर व्हायरल झाला असून एसटीतील वाहक व चालकांना मोठ्या प्रमाणात ट्रोल केले जात आहे. संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान पत्रकारांनी त्यांना घरी सोडले.दरम्यान आंबेगाव तालुका नाभिक संघटनेचे अध्यक्ष गणपतराव क्षीरसागर यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला असून संबंधित वाहक व चालकावर राज्य परिवहन महामंडळाने कारवाई करावी. या मागणीचा पाठपुरावा करणार असल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले.

# पिस्तूल रोखून खुनाचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाला अटक

शिरूर– शिरूर तालुक्यातील करडे गावात पैशाच्या वादातून पिस्तूल रोखून खुनाचा प्रयत्न करणाऱ्याला पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. दीपक संपत नवले (वय २३ , रा. करडे, ता. शिरूर) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून एक पिस्तूल आणि जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे.



१२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता दीपकने महेश रोडे याच्यावर प्लॉटिंग व्यवहारातील वादातून पिस्तूल रोखून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदला गेला. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखेने तपास हाती घेतला.पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार तुषार पंदारे, जनार्धन शेळके, राजू मोमीन आणि संजू जाधव यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे करडे गावात सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. तपासात दीपकने गुन्ह्याची कबुली दिली.या कारवाईने गावातील वाढत्या गुन्हेगारीला आळा बसला आहे. जप्त शस्त्रांचा तपास सुरू असून, पुढील कारवाई शिरूर पोलीस करत आहेत.

# महापालिकेतील गैरकाराभाविरोधात पालकमंत्र्यासोबत घेणार बैठक –चंद्रकांत पाटील

पुणे – पुणे महापालिकेत एकामागोमाग एक गैरव्यवहाराचे प्रकरणे समोर येत आहेत, मर्जीतील ठेकेदाराच्या भल्यासाठी कोट्यावधी रुपयांच्या निविदा काढल्या जात आहेत. प्रशासक काळात अनेक गोष्टी चुकीच्या पद्धतीने होत असूनसुद्धा सत्ताधाऱ्यांचे त्यावर नियंत्रण नाही. अशा स्थितीत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी डांबर खरेदी घोटाळा , सुरक्षा रक्षक नियुक्ती, नाले सफाई निविदांमधील घोळ यासह अन्य विषयांवर उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक घेतली जाईल असे स्पष्ट केले.



कोथरूड विधानसभा मतदारसंघातील विविध विषयासंदर्भात पाटील यांनी पुणे महापालिकेत बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी येथील पद्मश्री ग. दि. माडगूळकर स्मारकाच्या कामाची पाहणी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. पत्रकारांशी संवाद साधला.

प्रशासक राजवटीत पुणे महापालिकेचे नुकसान होणारे अनेक निर्णय होत आहेत. डांबर खरेदीत घोटाळा झाल्याचे पुरावे दिलेले असले तरी अद्याप कोणावरही कारवाई झालेली नाही. सुरक्षा रक्षक नियुक्ती आणि नवीन निविदेची प्रक्रिया यावरून आरोप झालेले आहेत. नाले सफाईच्या कामात रिंग करून कामे घेण्यात आली आहेत.

या बद्दल पत्रकारांनी विचारले असता पाटील म्हणाले, मी कोथरूड मतदारसंघातील प्रश्नांसंदर्भात बैठक घेतली होती. शहराच्या विषयावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत बैठक पार होते. महापालिकेतील गैरप्रकारासंदर्भात अधिकाऱ्यांना जाब विचारला जाईल. त्यासाठी अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक घेतली जाईल, असे पाटील यांनी सांगितले.

उशिरा जागा मिळत असल्याने भूसंपादनाचा खर्च वाढत आहे. त्यामुळे बाणेर–बालेवाडी यासह कोथरूड मतदारसंघातील मिसिंग लिंकचे रस्ते करण्यासाठी सक्तीने भूसंपादन केले जाईल. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवावेत अशी सूचना प्रशासनाला केली आहे.कोथरूडमध्ये पाणी पुरवठा विभागामार्फत कामे सुरु असल्याने अनेक ठिकाणी पाणी पुरवठा विस्कळित झालेला आहे. त्याबाबतही सूचना केल्या आहेत. पाषाण तळे सुशोभीकरण करण्यासाठी अधिकाऱ्यांसोबत संयुक्त पाहणी केली जाणार आहे. बाणेर–बालेवाडी भागात नाट्यगृह बांधण्यासाठी प्रशासनासोबत चर्चा झाली आहे. त्यासाठी योग्य जागेचा शोध सुरु आहे, असे ही पाटील यांनी सांगितले.

# कायद्याबरोबरच पुरुषी मानसिकता बदलणे गरजेची : प्रा. विलास कुलकर्णी

जुन्नर, : ''कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंधक कायदे अधिक कडक करण्याबरोबर समाजातील पुरुषी मानसिकतेत बदल करणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन श्री शिवछत्रपती महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. विलास कुलकर्णी यांनी येथे केले.

येथील श्री शिवछत्रपती महाविद्यालयाच्या तक्रार समिती व महिला कक्षाच्या संयुक्त विद्यमाने 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा २०१३' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी प्रा. कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यशाळेत कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेसंबंधी जागरूकता आणि कायद्याच्या तरतुदींची माहिती देण्यात आली. प्राचार्य डॉ. महादेव वाघमारे यांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व विशद केले. या वेळी उपप्राचार्य रवींद्र चौधरी, प्रबंधक मनीषा कोरे, पर्यवेक्षक समीर श्रीमंते तसेच विद्यार्थिनी व महिला प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक अनिशा दुराफे व शिल्पा सोनवणे यांनी कायद्याच्या अंमलबजावणी विषयी तक्रार समितीची भूमिका आणि सुरक्षित कार्यस्थळ निर्मितीवर तपशीलवार मार्गदर्शन केले. महाविद्यालयात विद्यार्थिनी व प्राध्यापक महिला कर्मचारी वृंदासाठी तक्रार निवारण समितीही स्थापन केली आहे. सुप्रिया काळे यांनी प्रास्ताविक केले. मयूरी कुंभोजे यांनी सूत्रसंचालन केले. विक्रम रसाळ यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांना दिलासा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व परीक्षांच्या निकालाबाबत महत्त्वाची अपडेट

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने उन्हाळी परीक्षांचे नियोजन काटेकोरपणे केले आहे. येत्या ३० जूनपूर्वी सर्व परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येतील आणि नवीन शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे नवनियुक्त प्रभारी संचालक डॉ.प्रभाकर देसाई यांनी दिली आहे.




डॉ. देसाई म्हणाले, पुढील शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन निकाल वेळेत लावण्यावर भर देत आहे. निकाल वेळेवर लागले नाहीत तर विद्यार्थ्यांना भारतातील विविध राज्यांमध्ये तसेच परदेशी शिक्षणासाठी जाण्यासाठी अडचणी निर्माण होतात. विद्यार्थ्यांना संबंधित संधी प्राप्त व्हावी यासाठी विद्यापीठ प्रशासन निकाल वेळेत लावण्यासाठी प्रयत्नशील आहे.

पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या परीक्षा या २५ मार्च ते २५ एप्रिलदरम्यान महाविद्यालय स्तरावरच घेण्यात येणार आहेत. त्याचा निकालदेखील महाविद्यालय स्तरावरच जाहीर करण्यात येणार आहे. तर द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या परीक्षा ९ एप्रिलपासून सुरू ... अभ्यासक्रमांचे पेपर २५ मे पर्यंत पूर्ण होतील. तसेच फार्मसी, विधी अशा काही अभ्यासक्रमांचे शैक्षणिक सत्र यंदा उशिरा सुरू झाले आहे. त्या विषयांच्या परीक्षांना जून महिन्याचा पहिला आठवडा उजाडण्याची शक्यता आहे. ज्या विषयांचे पेपर संपलेले आहेत. त्या विषयांच्या पेपर तपासणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यामध्ये महाविद्यालयांकडून उत्तरपत्रिका गोळा करणे, कॅप सेंटरला घेऊन येणे आदी प्रक्रिया सुरू आहे. लवकरच पेपर तपासणीचे काम सुरू होणार आहे.एकीकडे पदवी स्तरावरील परीक्षा सुरू असतानाच आता २१ आणि २ एप्रिलपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ...षयांचीदेखील परीक्षा सुरू होणार आहे. ... मे महिन्याच्या दुसर्या किंवा तिसर्या आठवड्यात संबंधित परीक्षा पूर्ण करण्यात येतील. त्यामुळे पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विषयांचे निकालदेखील ३० जूनपर्यंत जाहीर करण्यात येणार आहे.

दरम्यान, परीक्षा अर्ज भरण्यास जी मुदतवाढ विद्यापीठामार्फत देण्यात येत आहे. त्यातून अधिकाधिक विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध व्हावी हा उद्देश आहे. परंतु यातून परीक्षांचे नियोजन किंवा वेळापत्रक कोणत्याही परिस्थितीत पुढे ढकलले जाणार नाही. परीक्षा नियोजित वेळेतच पूर्ण केल्या जाणार असून, परीक्षांचे निकाल ३० जूनपूर्वीच जाहीर केले जाणार असल्याचेदेखील डॉ.देसाई यांनी स्पष्ट केले.

# 'एआय आणि संस्थापकांची मानसिकता' विषयावर प्रेरणादायी सत्र; उपस्थितांनी जाणून घेतला राजेश डेम्बला यांचा प्रवास

पुणे । प्रतिनिधी

रोजी, पुणे गुजराती युथ फोरम (पीजीवायएफ) ने एआय आणि संस्थापकांची मानसिकता या विषयावर एक प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात दूरदर्शी उद्योजक आणि वक्ते राजेश डेम्बला यांचा समावेश होता. या कार्यक्रमात त्यांनी कोंढवा बुद्रुक, पुणे येथील जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटर येथील भव्य क्रोम बँक्वेट येथे सहभाग घेतला.




चारशेहून अधिक उत्साही सहभागींसह, हा कार्यक्रम भव्य यशस्वी झाला, ज्यामुळे प्रेक्षकांना तंत्रज्ञान आणि उद्योजकतेच्या भविष्याबद्दल ज्ञान, प्रेरणा आणि स्पष्टतेने समृद्ध केले. राजेश डेम्बला यांचा प्रवास हा चिकाटी आणि दूरदृष्टीचा खरा पुरावा आहे. विनम्र सुरुवातीपासून ते मालिका उद्योजक बनण्यापर्यंत आणि भारताच्या तंत्रज्ञान आणि स्टार्टअप परिसंस्थेतील एक प्रसिद्ध नाव, त्यांची लवचिकता आणि स्वतः बनवलेल्या यशाची कहाणी प्रेक्षकांना खोलवर जाणवली. आजच्या वेगाने विकसित होत असलेल्या जगात कृत्रिम बुद्धिमत्ता, व्यवसाय उभारणी आणि संस्थापकाची मानसिकता राखण्यावरील त्यांच्या शक्तिशाली अंतर्दृष्टीचा उपस्थित असलेल्या प्रत्येकावर कायमचा प्रभाव पडला.

या कार्यक्रमाचे विजेते पीजीवायएफ चे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि युवा सल्लागार राजेशभाई शाह आणि एसपीजीबीएसचे संयुक्त व्यवस्थापकीय विश्वस्त नैनेशभाई नंदू होते. ज्यांचे सतत पाठबळ, प्रोत्साहन आणि नेतृत्व तरुणांना सक्षम करण्यात आणि अशा समृद्ध कार्यक्रमांना चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पुणे गुजराती युवा मंच टीम सत्येन पटेल (संस्थापक अध्यक्ष), हर्षित देसाई आणि सिद्धार्थ शाह (उपाध्यक्ष), जीत गांधी (एसआयजी लीड), अंकिता पटेल (सचिव), तसेच आमचे उत्साही योगदानकर्ते विशाल पटेल, नितेश पटेल, उल्का शाह आणि वैशाली शाह यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम नावीन्यपूर्णता, शिक्षण आणि एकतेद्वारे समुदायाला सक्षम करण्याच्या सामूहिक प्रवासात आणखी एक मैलाचा दगड ठरतो.